www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

# दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १८५ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शुक्रवार, ०६ डिसेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118



■ महापरिनिर्वाणदिनी ऐरोली येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर ज्ञानस्मारकात वैचारिक...

पान ३ वर....



■ जे.जे. रुग्णालयाच्या परिचर्या महाविद्यालयाच्या प्रमुखपदी डॉक्टरची...

पान ६ वर....







# राज्यात पुन्हा फडणवीस सरकार

● मुंबई, यश सावंत :

**राज्याचे ३१ वे मुख्यमंत्री म्हणून राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस यांना मुख्यमंत्री पदाची शपथ दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत ऐतिहासिक आझाद मैदानावर झालेल्या शपथविधी समारंभात मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासमवेत उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ गंगुबाई संभाजी शिंदे, अजित आशाताई अनंतराव पवार यांना राज्यपालांनी पद आणि गोपनियतेची शपथ दिली. राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी शपथविधी सोहळ्याचे संचलन केले.**

## एकनाथ शिंदे, अजित पवार उपमुख्यमंत्री

आजच्या शपथविधी कार्यक्रमास मंचावर केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय आरोग्य मंत्री जगतप्रकाश नड्डा, केंद्रीय भूपृष्ठ परिवहन व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय कृषि मंत्री शिवराजसिंह चौहान, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, केंद्रीय वाणिज्य व उद्योगमंत्री पियुष गोयल, केंद्रीय परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ एस जयशंकर, केंद्रीय पर्यावरण मंत्री भुपेंदर यादव, केंद्रीय माहिती तंत्रज्ञान व रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, केंद्रीय अवजड उद्योगमंत्री एच डी कुमारस्वामी, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, केंद्रीय सूक्ष्म मध्यम लघू उद्योगमंत्री जितनराम मांझी, केंद्रीय दळणवळण मंत्री जोतिरादित्य सिंधिया, केंद्रीय संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू, केंद्रीय मत्स्य व्यवसाय व पशुसंवर्धन मंत्री राजीव रंजन सिंह, केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योगमंत्री चिराग पासवान, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री पेमा खांडू, आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा शर्मा, छत्तीसगढचे मुख्यमंत्री विष्णूदेव साय, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंग सैनी, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव, मेघालयचे मुख्यमंत्री कॉनरॅड संगमा, राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा, त्रिपुराचे मुख्यमंत्री मानिक साहा, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी, पुद्दुचेरीचे मुख्यमंत्री एन रंगस्वामी, ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन मांझी, मणिपूरचे मुख्यमंत्री एन बिरेन सिंह, नागालँडचे मुख्यमंत्री नेफ्यु रिओ, सिक्कीमचे मुख्यमंत्री प्रेमसिंह तमांग, केंद्रीय राज्यमंत्री सर्वश्री रामदास आठवले, मुरलीधर मोहोळ, प्रतापराव जाधव, रक्षाताई खडसे, विविध राज्याचे उपमुख्यमंत्री सर्वश्री केशव प्रसाद मौर्य, ब्रजेश पाठक, पवन कल्याण, राजेंद्र शुक्ला, अरुण सावो, विजय शर्मा, प्रेमचंद बैरवा, विजयकुमार सिन्हा, सम्राट चौधरी, कनक बर्धन सिंह देव, प्रवती परिदा, चौना मेन, प्रेसतोन त्यांसोंग, यांथुंगो पटॉन, टी. आर. झेलियांग, एस धार, श्रीमती दिया कुमारी यांच्यासह साधू, संत, महंत, विविध धर्मांचे गुरु, राज्यातील खासदार, आमदार, विविध राजकीय पक्षांचे वरिष्ठ नेते, उद्योग, क्रीडा, मनोरंजन क्षेत्रातील विविध मान्यवर, विशेष निमंत्रित अतिथी उपस्थित होते.

शपथविधी सोहळ्याची सुरुवात राष्ट्रगीत व राज्य गीताने करण्यात आली.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं पहिल्या पत्रकार परिषदेतलं वक्तव्य

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची पहिली स्वाक्षरी वैद्यकीय मदतीच्या फाईलवर

मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी मुख्यमंत्र्यांनी पहिली स्वाक्षरी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या फाईलवर केली. पुणे येथील रुग्ण चंद्रकांत शंकर कुऱ्हाडे यांना पाच लाखाची मदत मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून देण्याचे निर्देश त्यांनी फाईलवर दिले आहेत. चंद्रकांत कुऱ्हाडे यांच्या पत्नीने बोन मॅरो ट्रान्सप्लांट उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अर्थसहाय्य देण्याची विनंती केली होती.

### आमच्या भूमिका बदलल्या आहेत पण..

महायुतीतल्या आमच्या भूमिका बदलल्या आहेत एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होते, मी आणि अजित पवार हे उपमुख्यमंत्री होतो. २०१९ ला ७२ तासांसाठी मी आणि अजित पवार उपमुख्यमंत्री होतो. आता पुन्हा मी मुख्यमंत्री आहे आणि अजित पवार, एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री आहेत. आमचे रोल बदलले असले तरीही दिशा ती राहणार आहे, गती तिच राहणार आहे. आमची जी पहिली मंत्रिमंडळाची बैठक झाली त्या बैठकीत आम्ही तिघांनीही अधिकाऱ्यांना सांगितलं की मागच्या काळात आम्ही आलो तेव्हा ५० ओव्हरची मॅच होती, अजित पवार आले तेव्हा २०-२० ची मॅच झाली, आता टेस्ट मॅच आहे त्यामुळे सगळे निर्णय योग्यपणे घेऊन आणि पुढची पायाभरणी योग्य प्रकारे करत आपल्याला वाटचाल करायची आहे असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

### ज्या योजना जाहीर केल्या त्या सुरुच राहणार आहेत

विविध निर्णय आम्ही जे आधी घेतले होते ते पुढे सुरुच ठेवायचे आहेत. तसंच आमचा प्रयत्न हाच आहे जी आश्वासनं आम्ही दिली होती ती सुरुच ठेवण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत. मी जनतेला आश्वस्त करु इच्छितो की लोकाभिमुख सरकार, सगळ्या समाजांना बरोबर घेऊन चालणारं सरकार महाराष्ट्रात असेल. अडचणी येतात पण अडचणींवर मात करत आपण वाटचाल करतो. मी आपल्या सगळ्यांचीही या प्रयत्नांमध्ये साथ मागतो आहे. आपल्या माध्यमातून महाराष्ट्राच्या १४ कोटी जनतेला हे आश्वस्त करु इच्छितो की हे सरकार पारदर्शीपणे आणि जनतेसाठी काम करणार आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

## गुजरातधार्जिण्या नव्या भाजपा सरकारने महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला धक्का लावू नये : नाना पटोले



● मुंबई, विशाल कारंडे :

निवडणूक आयोगाच्या मदतीने मतमोजणीत घोटाळे करुन महाराष्ट्रात जनतेच्या मतांची चोरी करणारे सरकार राज्यात स्थापन झाले आहे. चोरीचे बहुमत असतानाही नव्या सरकारची स्थापनाच वादाने झाली असून या तीन पक्षातील अंतर्गत वादामुळे महाराष्ट्राची प्रतिमा देशात मलीन झाली आहे. महाराष्ट्राच्या माथी पुन्हा गुजरातधार्जिणे सरकार बसले असले तरी छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, फुले, आंबेडकर यांच्या महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला धक्का लावू नये, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे.

नव्या सरकारच्या स्थापनेसंदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, महायुतीकडे बहुमत असतानाही सरकार स्थापन्यासाठी कसरत करावी लागली. एकनाथ शिंदे व अजित पवार यांना या सरकारमध्ये फारसे महत्व दिले जाईल असे वाटत नाही.

पान २ वर

## १० वर्षीय मुलीचा शाळेत विनयभंग


● ठाणे, विशेष प्रतिनिधी :

**पोलिसांना माहिती न दिल्याने ठाण्यात मुख्याध्यापिकेला अटक**

बदलापूर येथील अत्याचार प्रकरण ताजे असतानाच शाळांमधील अत्याचाराच्या घटना थांबण्याचे नाव घेत नाहीयेत. अशाच एका घटनेमध्ये शाळा प्रशासनही योग्य ती कारवाई करत नसल्याचा धक्कादायक प्रकार ठाण्यातून समोर आला आहे.

पान २ वर

## राज्यात नवं सरकार येताच राज ठाकरेंची पोस्ट चर्चेत!



● मुंबई, दिगंबर जाधव :

राज्यात नवं सरकार स्थापन झालं असून देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची तर एकनाथ शिंदे आणि अजित पवारांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेला सत्तास्थापनेचा तिढा अखेर सुटला आहे. आजपासून राज्यात देवेंद्रपर्वाला सुरुवात झाली आहे.

दरम्यान, राज्यात नवं सरकार येताच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पोस्ट केली आहे.

“आज माझे स्नेही आणि भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्रातील नेते श्री. देवेंद्र फडणवीस यांनी तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली, याबद्दल त्यांचं अभिनंदन”, असं राज ठाकरे सुरुवातीला म्हणाले. ते पुढे म्हणाले, “२०१९ ला खरंतर ही संधी त्यांना मिळायला हवी होती, पण तेंव्हा आणि पुढे २०२२ मध्ये जे घडलं त्यामुळे ती संधी हुकली.

पान २ वर

## कल्याणमध्ये इराणी वस्तीत पोलिसांवर हल्ला

### वॉन्टेड आरोपीच्या अटकेदरम्यान मोठा गोंधळ, तीन पोलीस कर्मचारी जखमी


### पाच जणांना अटक तर ३६ हून अधिक जणांवर गुन्हा दाखल

● कल्याण, गणेश बागडे :


वॉन्टेड आरोपी ओनु लाल इराणी (२०) याच्या अटके दरम्यान पोलिसांवर हल्ला झाल्याची घटना बुधवारी रात्री आंबिवलीतील इराणी वस्ती परिसरात उघडकीस आली. ही घटना आंबिवली रेल्वे स्थानकावर घडली. बुधवारी रात्री दहाच्या सुमारास मुंबई, अंधेरी, एमआयडीसी येथून १० ते १५ पोलिसांचे पथक वॉन्टेड आरोपीला पकडण्यासाठी आले असता, पोलिसांनी



आरोपीला ताब्यात घेतले. नंतर मुंबईला रवाना झाल्याची माहिती आरोपीच्या कुटुंबीयांना आणि स्थानिक लोकांना कळली आणि त्यांचा मोठा



जमाव स्टेशनवर पोहोचला. या लोकांनी पोलिसांवर हल्ला करत दगडफेक सुरू केली. अचानक झालेल्या या हल्ल्यात तीन पोलीस



जखमी झाले. या घटनेनंतर स्थानकात गोंधळ उडाला आणि पोलिसांनी तात्काळ अतिरिक्त फौजफाट्यांना मदतीसाठी पाचारण केले.

पोलिसांवर दगडफेक करणाऱ्या २५ जणांवर विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल करत चौघांना ताब्यात घेण्यात आले आहे. तर दगडफेक करणाऱ्या उर्वरित लोकांचा खडकपाडा पोलिसांकडून कसून शोध घेण्यात येत असल्याची माहिती कल्याणचे डीसीपी अतुल झेंडे यांनी दिली आहे. याप्रकरणी पोलिसांनी आंबिवली परिसरात कडक बंदोबस्त ठेवला असून घटनेचा कसून तपास सुरू केला आहे. झोन ४ च्या टीमने रात्रभर कारवाई केली आणि पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत ३६ हून अधिक जणांवर गुन्हा दाखल केला. यापैकी ११ जणांची नावे आहेत, तर उर्वरित अज्ञात आहेत. नामित आरोपींमध्ये कुर मौसमी खान, गाझी जॉन, गुलाम, तौफिक, फातिमा, शहजादी, जिनी, मोसम, जाफर, नूरी आणि सेरा यांचा समावेश आहे.

यातील पाच आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये चार महिला आणि एका पुरुषाचा समावेश आहे. फातिमा इराणी, नादिरा इराणी, कुर मोस्मी खान, मोस्मी इराणी आणि आणखी एक व्यक्ती अशी अटक आरोपींची नावे आहेत. या सर्वांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली आहे.

## संपादकीय
संपादक - राकेश शंकर गोरे

# तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कारागृह सुरक्षा व सुधारणा

महाराष्ट्रात एकूण ६० कारागृहे आहेत. त्यातील मुंबई, ठाणे, तळोजा, येरवडा- पुणे, नाशिक, नागपूर, छ. संभाजी नगर, अमरावती ही मध्यवर्ती कारागृहे आहेत. सध्या या कारागृहांत जवळजवळ ४१ हजार कैदी आहेत. विशेष म्हणजे, मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांची संख्या तेथील मान्यताप्राप्त क्षमतेहून कित्येक पटीने अधिक आहे. यातील न्यायालयाने शिक्षा सुनावलेले ७ हजार, ७०० कैदी आहेत, ज्यात ७ हजार, ७० पुरुष व २४५ महिला आहेत. याशिवाय ३३ हजार, ३०० वर कच्चे कैदी आहेत, ज्यामध्ये ३१ हजार, ७०० पुरुष, तर १ हजार, ३४२ महिला आहेत. या कैद्यांसोबतच १५ तृतीयपंथीसुद्धा कच्चे कैदी म्हणून बंदिस्त आहेत.मुंबईतील जॉब्स

सर्वाधिक कैदी असलेल्या कारागृहांचा तपशील पुढीलप्रमाणे : येरवडा - ५ हजार, ५१०, ठाणे - ३ हजार, ९९९, मुंबई - ३ हजार, ४४१, तळोजा - २ हजार, ५०२, कल्याण - २ हजार, ०५०, व नागपूर - १ हजार, ८९२. जवळपास ७९ टक्के कैदी हे कच्चे कैदी आहेत. त्यांना कोणतेही शारीरिक काम देता येत नाही. त्यांना शिक्षण, शिक्षेत सवलत अशा सुविधादेखील मिळत नाहीत. कच्च्या कैद्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे आणि त्याच्यावर शासनाचादेखील खूप खर्च होतो. त्यांना न्यायालयात वेळेवर उपस्थित करणे, त्यांच्या सुरक्षेसाठी पोलिसांचा फौजफाटा तैनात करणे आणि पोलीस वाहनांची व्यवस्था करणे, या कामांचा भारही शासनाला सहन करावा लागतो. याशिवाय कच्च्या कैद्यांना न्यायालयात नेताना तसेच न्यायालयातही त्यांच्यावर त्यांचे विरोधक जीवघेणा हल्ला करून, त्यांना ठार मारण्याचा वेळोवेळी प्रयत्न करतात. कच्च्या कैद्यांना वारंवार रुग्णालयात तपासासाठी न्यावे लागते. अनेकवेळा कारागृहात राहण्यातून सुटका मिळवण्यासाठी व रुग्णालयात स्वतःला ठेवून घेण्यासाठी हे कच्चे कैदी डॉक्टरांवर दबाव टाकतात.

वरील समस्यांवर उपाय म्हणून भारत सरकारने दि. १ जुलै २०२४ रोजीपासून लागू केलेल्या 'भारतीय नागरिक सुरक्षा संहिते'मधील 'कलम 530'चा उल्लेख करणे आवश्यक आहे. या कलमाप्रमाणे न्यायालयात तक्रारदाराची तपासणी, साक्षीदारांचे जबाब इत्यादी सर्व खटल्याचे कामकाज दृकश्राव्य पद्धतीने करण्यास नुसती मान्यता नव्हे, तर प्रोत्साहन देण्यात आले आहे. त्याचबरोबर सर्व शासकीय रुग्णालयात आज टेली-मेडिसीन व्यवस्था उपलब्ध आहे. त्याद्वारे कैद्यांना कारागृहातच तिथे नेमलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्याच्या मदतीने जवळच्या शासकीय रुग्णालयातील तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्याकडून उपचार मिळण्याची सोय उपलब्ध आहे. दृकश्राव्य माध्यमातून कच्चा कैदी त्याच्या विधि सल्लागाराशी तसेच नातेवाईकांशी संभाषण करू शकतो. त्यामुळे काही ठराविक मध्यवर्ती कारागृहांत गर्दीने व गैरसोयीने राहण्यापेक्षा राज्यातील ज्या कारागृहात कच्चे कैदी कमी आहेत, अशा ठिकाणी न्यायालयाचा आदेश मिळवून राहणे सहज शक्य आहे. तसेच कच्चा कैदी स्वतःच्या सुरक्षेसाठी सुनावणी दृकश्राव्य पद्धतीने व्हावी, म्हणून मागणी करू शकतो. जसे श्रद्धा वालकर खटल्यातील आरोपीने सांगितले होते की, त्याला लॉरेन्स बिष्णोई गॅन्गकडून धमकी आहे, तरी त्याची सुनावणी दृकश्राव्य माध्यमाने घेण्यात यावी.मुंबईतील जॉब्स

याशिवाय, कारागृहातून सुरक्षा भेदून ठिकठिकाणी, दहशतवादी आणि कुख्यात गुन्हेगार पळून जाण्यात अनेकवेळा यशस्वी होताना दिसतात. आज जवळजवळ सर्व महत्त्वाच्या कारागृहात पाकिस्तानी दहशतवादी, पाकिस्तानच्या मदतीने दहशतवाद माजवणारे काश्मीरमधील दहशतवादी, खलिस्तानवादी, 'सिमी'सारख्या मूलतत्त्ववादी संघटनांचे कार्यकर्ते, 'इसिस'मध्ये भाग घेऊ इच्छिणारे, माओवादी आणि 'मोक्का' कायद्याप्रमाणे कारागृहात ठेवलेले अनेक कुख्यात गुन्हेगार हे मुंबई, ठाणे, तळोजा, नाशिक, येरवडा-पुणे, नागपूर किंवा अन्य मध्यवर्ती कारागृहांत आहेत. यातील कित्येकजण खटल्याच्या प्रतिक्षेत कारागृहात आहेत व त्यामुळे या कारागृहांवर दहशतवादी हल्ला होण्याची नेहमीच भीती असते. या प्रकारच्या कैद्यांना अन्य सुरक्षित कारागृहात ठेवून दृकश्राव्य पद्धतीचा वापर करण्याने ही भीती खूपच कमी होऊ शकते.

## आजची चित्रोळी



वातावरणी आवाज वेगळा
टंवकारूनी बघती डोळे !
साध्य मोह ते सुटे पुढ्यातून
जीवापुढें कांहीं न आगळे !!

- मुकुंद कुलकर्णी, मुंबई

# महिलांचे उध्दारकर्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर

आज डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन. आजच्याच दिवशी सण १९५६ साली डॉ बाबासाहेब आंबेडकर आपल्या लाखो अनुयायांना दुःखसागरात लोटून कायमचे निघून गेले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांना महापरिनिर्वाणदिनी विनम्र अभिवादन! डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी उभे आयुष्य दिन दलित, उपेक्षित, वंचित वर्गासाठी घालवले. या वर्गासाठी बाबासाहेबांनी जे कार्य केले ते तर सर्वांनाच माहीत आहे पण डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी महिला वर्गासाठी जे कार्य केले ते खूप कमी लोकांना माहीत आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने महिलांचे उध्दारकर्ते आहेत पण दुर्दैवाने आजही देशातील अनेक महिलांना हे माहीतही नाही. बाबासाहेबांनी महिलांसाठी जे कार्य केले ते याआधी कोणीही करू शकले नाही. आपल्या पुरुष प्रधान संस्कृतीत स्त्रिया या गुलामच होत्या. स्त्रियांना गुलामाचीच वागणूक मिळत होती. अगदी उच्चवर्णीय स्त्रिया देखील गुलामीचेच जीवन जगत होत्या. डॉ बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्यांनंतर स्त्रियांनाच उपेक्षित मानत होते. मातोश्री रमाबाईला लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात महिलांच्या उन्नती व मुक्तीसाठी लढणारा मी योद्धा आहे. महिलांना या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी मी शेवटच्या क्षणापर्यंत लढेल. बाबासाहेबांनी त्यांचे बोल खरे करून दाखवले ते राज्यघटनेच्या माध्यमातून. बाबासाहेबांनी राज्यघटनेच्या माध्यमातून महिलांना इतके अधिकार दिले की जे त्यांना हजारो वर्ष आणि ३३ कोटी देवताही देऊ शकले शकले नाही. पुरुषप्रधान संस्कृती आणि मनुवादी विचारसरणीमूळे ज्या महिलांना पुरुषांच्या पायाशी स्थान होते त्या महिला आज पुरुषांच्या बरोबरीने उभ्या राहत आहेत. भारतीय महिला आज जो मोकळा श्वास घेत आहेत तो केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकरांमुळेच घेत आहेत. यासाठी भारतीय महिलांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांना प्रातः स्मरणीय आणि वंदनीय मानले पाहिजे. नोव्हेंबर १९३८ मध्ये कुटुंब नियोजना संबंधीचे विधेयक डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नांमुळेच मुंबई विधिमंडळात आले होते. त्यांनी महिलांच्या हितासाठी व कल्याणासाठी कुटुंब नियोजनाचा मार्ग दाखवला. मुलं केंव्हा पाहिजे याचे स्वातंत्र्य त्यांनी महिलांना दिले. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे भारताचे मजूर मंत्री असताना त्यांनी महिला सक्षमीकरणाचे अनेक निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली. खान कामगार महिलेला प्रसूती भत्ता, कोळसा खाणीत काम करणाऱ्या महिलांना पुरुषां इतकिच मजुरी, बहूपत्नीत्वला कायद्याने बंदी, मजूर व कष्टकरी महिलांना २१ दिवस किरकोळ रजा, एका महिन्याची हक्काची रजा, दुखापत झाल्यास नुकसान भरपाई आणि वैद्यकीय रजा, महिलांना पगारी प्रसूती रजा, २० वर्ष सेवा करुन निवृत्त झाल्यावर मरेपर्यंत निवृत्तिवेतन असे महिलांसाठी अनेक क्रांतिकारक निर्णय त्यांनी मजूर मंत्री असताना घेतले. बाबासाहेबांनी १९४७ साली कायदा मंत्री असताना हिंदू संहिता विधेयक अर्थात हिंदू कोड बिलाचा प्रस्ताव संसदेत मांडला. हे विधेयक क्रांतिकारी होते. हिंदू वैयक्तिक कायद्यात एकाच वेळी परस्परपूरक पुरोगामी तत्वे समाविष्ट करण्याचे हे क्रांतिकारक पाऊल होते.



अस्पृश्यतेचे उच्चाटन, लग्नासंबंधातील स्त्री पुरुष समानता, नवऱ्याने केलेल्या अन्याय अत्याचाराविरोधात दाद मागण्याचा अधिकार, महिलांना घटस्फोट घेण्याचा अधिकार, वारसा हक्काचा लाभ महिलांनाही देण्याची तरतूद इत्यादी तत्वे या बिलात डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी समाविष्ट केली होती. डॉ बाबासाहेबांच्या मते सामाजिक न्यायचा लढा यशस्वी होण्यासाठी हिंदू समाजाचा वैयक्तिक कायद्यामध्ये जाती व्यवस्था आणि पुरुषप्रधानता यांना नकार देऊन समान वैयक्तिक संबंधांची पायाभरणी करणे आवश्यक आहे. दुर्दैवाने या विधेयकाला संसदेत प्रचंड विरोध झाला. सुरवातीला पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरुंचा या विधेयकाला पाठींबा होता पण कॉंग्रेसमधील सनातनी विचाराच्या नेत्यांनी या विधेयकाला प्रखर विरोध दर्शवल्यानंतर पंडित नेहरुंनी हे विधेयक मागे घ्यावे अशी विनंती बाबासाहेबांना केली. देशाची राज्यघटना बनवताना बाबासाहेबांनी जितकी मेहनत घेतली होती तितकीच मेहनत हे विधेयक बनवताना बाबासाहेबांनी घेतली होती. त्यामुळे बाबासाहेबांना खूप वाईट वाटले. हिंदू कोड बिलाला होणारा विरोध बाबासाहेबांसाठी खूप त्रासदायक ठरला शेवटी या मुद्द्यावरुन त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला.

कोणतीही चळवळ महिलांशिवाय पूर्ण होऊ शकत नाही, सामाजिक क्रांती करायची असेल तर त्यात महिलांचा समावेश असावाच असे बाबासाहेबांचे मत होते म्हणूनच त्यांच्या सर्व आंदोलनात महिलांचा समावेश होता मग ते १९२७ चे चवदार तळ्याचे आंदोलन असो की १९३० च्या नाशिकमधील काळाराम मंदिरातील आंदोलन असो. १९४२ च्या नागपुरातील महिला परिषदेत महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. लग्न हे मुलीच्या प्रगतीत अडसर ठरू नये. मुलीवर लग्न लादू नये ते तिच्या संमतीनेच व्हावे. लग्नानंतर बायको ही नवऱ्याची गुलाम नको मैत्रीण बनायला हवी. पतीच्या संपत्तीत पत्नी देखील समान वाटेकरी आहे. पत्नीच्या सुरक्षेची जबाबदारी पतीची असून तिला शारीरिक किंवा मानसिक त्रास जर पतीने दिला तर त्याला कायद्याने शिक्षा व्हायला हवी असे त्यांचे मत होते. भारतीय राज्यघटना लिहिताना डॉ आंबेडकरांनी राज्यघटनेच्या कलम १४, १५, १५(३), १६(२), ३९(क), ३९(घ), ३९(ड), ४२, ३२५ इत्यादी कलमांचा अंतर्भाव करून महिलांचे हित व कल्याण जोपासण्याचा प्रयत्न केला आहे. दुर्दैवाने देशातील महिला आजही बाबासाहेबांच्या या कार्याविषयी अनभिज्ञ आहेत. बाबासाहेबांचे भारतीय स्त्रियांवर अनंत उपकार आहेत. बाबासाहेबांनी महिलांसाठी इतके करून ठेवले आहे की अनेक जन्म घेऊनही हे उपकार फिटनार नाही.

**श्याम बसप्पा ठाणेदार, पुणे**

# मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी कमलिनी कर्णबधिर विद्यालय येथे दिली भेट

**ठाणे (रोहित जैसवाल) -** जागतिक दिव्यांग दिनानिमित्त शैक्षणिक गुणवत्ता व विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सोईसुविधाची पाहणी करण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी आज, दि. 04 डिसेंबर 2024 रोजी सकाळी साडे दहा वाजता कमलिनी कर्णबधिर विद्यालय, ठाणे (पू) येथे भेट दिली.यावेळी जिल्हा समाज कल्याण अधिकारी उज्वला सपकाळे, कमलिनी कर्णबधिर विद्यालयाचे मुख्याध्यापक माया कुलकर्णी, शिक्षक तसेच मोठ्या संख्येने शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते. या भेटी दरम्यान शाळेतील वातावरण कर्णबधिर विद्यार्थ्यांसाठी सकारात्मक असून विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी कमलिनी कर्णबधिर विद्यालयातील शिक्षकांनी मोलाची कामगिरी केली आहे असे कौतुक मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले. शाळा भेटीतून शालेय कामकाज, वर्गातील अध्यापन, विद्यार्थी अध्ययन स्तर, शाळेतील वर्ग व्यवस्थापन, सीएसआर सहकार्यातून मिळालेली शैक्षणिक साहित्य, शिक्षकांच्या अध्यापनामध्ये शैक्षणिक साहित्याद्वारे कर्णबधिर मुलांच्या अध्ययन क्षमतेत होणारी वाढ याविषयांवर लक्ष केंद्रित करण्यात आले. शाळेतील 'वाचा व श्रवण कक्ष' पाहणी यावेळी करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक वाचन तसेच प्रगती साधण्यासाठी आवश्यक बाबीबद्दल मार्गदर्शन करण्यात आले, तसेच भावी काळात कर्णबधिर विद्यार्थ्यांच्या अध्ययनात वाढ करण्यासाठी योग्य त्या सुविधा उपलब्ध करून दिले जाईल व विद्यार्थी आणि शाळेच्या गरजा पुरवण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल असेही आश्वासन जिल्हा समाज कल्याण अधिकारी उज्वला सपकाळे यांनी दिले.



# दादर लोहमार्ग पोलीस ठाणे तर्फे महापरिनिर्वाण दिनानिमित्त रेल्वे प्रवासी सुरक्षा एवंम स्वच्छता अभियान संपन्न

**मुंबई (संदिप जाबडे) -** ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिनाच्या अनुषंगाने सुरक्षेच्या दुपटीने रेल्वे प्रवाश्यात सुरक्षा बाबत जनजागृती करण्यात आली रेल्वे हेल्पलाईन नं १५१२, १३९ बददल माहीती देण्यात आली तसेच स्टेशन परिसर स्वच्छ ठेवण्या बाबत मार्गदर्शन करण्यात दादर लोहमार्ग पोलीस ठाणे तर्फे मंगळवार ३डिसेंबर २०२४ रोजी करण्यात आली. याला वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल कदम यांनी मार्गदर्शन केले. महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघाचे अध्यक्ष तथा सेन्ट्रल रेल्वे कमिटी सदस्य ZRUCC Member अभिजीत धुरत व आरपीआय अध्यक्ष राजाराम खरात, दिपक चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ॲड. योगिता सावंत, डॉ मनी, सुरेश शेट्टी, रत्नप्रभा सावंत, रेणूका साळुंखे, प्रमोद कासारे, शिरिष सावंत, अतुल जाधव, पोलीस, बुट पॉलीश कामगार मोठया संख्येने उपस्थित होते.



## पान १ वरून...

### ▶▶| गुजरातधार्जिण्या नव्या भाजपा सरकारने...

दिल्लीत वाऱ्या करुन मंत्रीपदांची भिक मागण्याची वेळ या दोघांवर आली. मोदी शाह यांच्या मेहरबानीवर शिंदे, अजित पवार सरकारमध्ये असतील. एकनाथ शिंदे यांची तर भाजपाला आता काहीच गरज नाही त्यामुळे बहुमत मिळाल्यापासूनच शिंदे व अजित पवारांना भाजपा व मोदी शाह यांनी जागा दाखवून दिली आहे. भाजपाने पुन्हा एकदा दोन प्रादेशिक पक्षांना संपवले आहे.

भाजपाचे सरकार स्थापन झाले असून निवडणूक त्यांनी दिलेली आश्वासने पूर्ण करावी लागतील. शेतकरी कर्जमाफी, कृषी पंपाची विज बिल माफ, लाडक्या बहिणींना दरमहा २१०० रुपये, २.५ रिक्त सरकारी पदांची भरती याची तातडीने अंमलबजावणी करावी. कॉंग्रेस पक्षाची विधानसभेतील संख्या कमी झाली आहे परंतु हिम्मत व ताकद कायम असून जनतेच्या प्रश्नांवर सरकारला जाब विचारल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही असेही नाना पटोले म्हणाले.

### ▶▶| राज्यात नवं सरकार येताच राज ठाकरेंची...

असो, पण यावेळेस महाराष्ट्रातील जनतेने महायुतीला म्हणण्यापेक्षा देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाला जे प्रचंड अविश्वसनीय बहुमत दिलं आहे, त्याचा या राज्यासाठी, इथल्या मराठी माणसांसाठी आणि मराठी भाषा आणि संस्कृतीसाठी तुम्ही योग्य वापर कराल अशी मी आशा करतो."

"पुढची ५ वर्ष सरकारच्या कुठल्याही चांगल्या उपक्रमांना माझा, माझ्या पक्षाचा पाठींबा असेल. पण सरकार चुकतंय, लोकांना गृहीत धरतंय असं जर जाणवलं, तर मात्र विधिमंडळात जरी सध्या शक्य नसलं तरी, विधिमंडळाच्या बाहेर मात्र आम्ही सरकारला त्यांच्या चुकांची जाणीव करून देऊ हे नक्की... मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार आणि तसंच भविष्यातील त्यांच्या मंत्रिमंडळातील सर्व सहकाऱ्यांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या शुभेच्छा", असंही राज ठाकरे म्हणाले.

राज ठाकरे यांनी विधानसभा निवडणुकीत १२८ जागांवर उमेदवार उभे केले होते. परंतु, त्यांना एकाही जागेवर विजय मिळवता आला नाही. दरम्यान, विधानसभा निवडणूक प्रचारसभांमध्ये आम्ही सत्तेत असू असं राज ठाकरे म्हणाले होते. तसंच, महायुतीला सत्ता स्थान करण्यास पाठिंबा देऊ असंही ते म्हणाले होते. परंतु, निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. दरम्यान, आता नवं सरकार स्थापन होताच त्यांनी नव्या सरकारला शुभेच्छा दिल्या आहेत.

### ▶▶| १० वर्षीय मुलीचा शाळेत विनयभंग

१० वर्षीय मुलीच्या विनयभंगाची तक्रार लपवून तिला धमकावल्याप्रकरणी मुंब्रा पोलिसांनी दिवा येथील ४३ वर्षीय शाळेच्या मुख्याध्यापकेला अटक करण्यात आली केली. या प्रकरणातील मुख्य आरोपी फरार असून, त्याला पकडण्यासाठी पोलिसांचा शोध सुरू करण्यात आला आहे.

ठाणे जिल्ह्यात एका खासगी शाळेच्या मुख्याध्यापिकेला अटक करण्यात आली आहे. शाळेत अज्ञात व्यक्तीने १० वर्षीय विद्यार्थिनीचा विनयभंग केल्याची माहिती मुख्याध्यापिकेने पोलिसांना दिली नसल्याचा आरोप आहे. मुंब्रा परिसरात असलेल्या एका शाळेत मंगळवारी सकाळी ही घटना घडल्याचे पोलिसांनी सांगितले.

मुंब्रा पोलीस ठाण्याच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, पीडित मुलगी इयत्ता पाचवीची विद्यार्थिनी असून ही घटना घडली तेव्हा तिच्या वर्गात ती एकटीच होती. त्यावेळी शॉर्ट्स आणि निळया रंगाचा टी-शर्ट घातलेला एक माणूस तिथे आला. त्याने मुलीचा विनयभंग केला आणि तिच्यावर हल्लाही केला. घाबरलेल्या मुलीने आरडाओरडा केला आणि त्यानंतर तो माणूस तिथून निघून गेला.

मुलीचा आवाज ऐकून मुख्याध्यापिका तिथे आल्या आणि त्यांनी पीडितेची विचारपूस केली. त्यानंतर मुख्याध्यापिका पीडित मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीसोबत बोलताना दिसल्या होत्या अशी तक्रार करण्यात आली. आरोपीने पळून जाताना एका शिक्षिकेला मुलीला शाळेत सोडण्यासाठी आलो होतो असं सांगितलं होतं. त्यानंतर मुलीने तिच्या पालकांना या घटनेची माहिती दिली. त्यांनी आरोपीविरुद्ध पोलिसात तक्रार दाखल केली.


जेव्हा मुलीने शाळेच्या मुख्याध्यापिकेला या घटनेची माहिती दिली तेव्हा त्यांनी याविषयी कुटुंबाला सांगू नको असे सांगण्यात आले. ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याची माहितीही समोर आली आहे. पालकांच्या तक्रारीनंतर, मुख्याध्यापिकेला या घटनेबद्दल पोलिसांना माहिती न दिल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी सांगितले की, अज्ञात व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण कायद्याच्या विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीचा शोध सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# महापरिनिर्वाणदिनी ऐरोली येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर ज्ञानस्मारकात वैचारिक अभिवादनासाठी भेटीचे आवाहन



## मुंबईत चैत्यभूमीवर नवी मुंबई महानगरपालिकेच्या ज्ञानस्मारकाची माहिती देणारा विशेष स्टॉल





**नवी मुंबई (भावना जैन)** - सेक्टर १५, ऐरोली येथील नवी मुंबई महानगरपालिकेच्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकातून 'ज्ञान हीच शक्ती' या बाबासाहेबांच्या प्रेरक विचारांचा व्यापक प्रसार होत असल्याने 'ज्ञानस्मारक' म्हणून नावाजले जात आहे. अनेक मान्यवरांनी याठिकाणी भेटी देऊन येथील सुविधांचे, त्यातही मुख्यत्वे येथील समृध्द ग्रंथालयाचे व चरित्र छायाचित्र दालनाचे कौतुक केले असून देशी-परदेशी पर्यटकांनीही आगळेवेगळे स्मारक म्हणून गौरव केला आहे.

५ डिसेंबर २०२१ रोजी स्मारकातील वैविध्यपूर्ण सुविधांचे लोकार्पण झाले असून मागील ३ वर्षात येथील रजिस्टरला नोंद करुन तब्बल ३ लाख २२ हजार ४०२ पर्यटकांनी याठिकाणी भेटी दिल्या आहेत व बाबासाहेबांच्या विचारांना प्राधान्य देणारे अभिनव स्मारक म्हणून प्रशंसा केली आहे.

पुस्तकांसह डिजीटल सुविधायुक्त अत्याधुनिक ग्रंथालयामुळे ज्ञानस्मारक अशी ओळख दृढ डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित तसेच त्यांच्या चरित्रावर व विचारांवर आधारित पुस्तकांप्रमाणेच याठिकाणी इतर महनीय व्यक्तींवरील ५ हजारहून अधिक पुस्तके उपलब्ध आहेत. याशिवाय आधुनिक युगातील ऑनलाईन वाचनाची सवय लक्षात घेऊन येथे ऑडिओ व्हिज्युअल सुविधांनी परिपूर्ण ई-लायब्ररीची सुविधा आहे. समृध्द ग्रंथालय हा या ज्ञानस्मारकाचा आत्मा असून या माध्यमातून अभ्यासकांना व वाचकांना पुस्तकांचा खजिना मोफत उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. त्यामुळे ज्ञानाला महत्व देणारे बाबासाहेबांचे पुतळाविरहीत ज्ञानस्मारक ही ओळख अल्पावधीतच रुढ झाली आहे. स्मारकामध्ये 'विचारवेध' आणि 'जागर' या व्याख्यान शृंखलांमुळे हे विचारांची आदानप्रदान करणारे ज्ञानकेंद्र म्हणून नावारुपाला आले असून स्मारकाला व्याख्यानानिमित्त भेटी देणाऱ्या नामवंत विचारवंत व साहित्यिकांनी देशातीलच नव्हे तर परदेशातील बाबासाहेबांच्या स्मारकापेक्षा हे स्मारक अत्यंत वेगळे असल्याचे अभिप्राय वेळोवेळी नोंदवले आहेत. येथील परिपूर्ण ई – लायब्ररी हा स्मारकाचा आत्मा असून या माध्यमातून अभ्यासकांना व वाचकांना विचारांचा खजिना विनामूल्य उपलब्ध आहे. त्यामुळे बाबासाहेबांच्या विचारांना महत्व देणारे हे स्मारक बाबासाहेबांचे पुतळाविरहीत 'ज्ञानस्मारक' म्हणून नावाजले जात आहे.

बाबासाहेबांचा जीवनपट उलगडणारे दुर्मीळ छायाचित्र दालन प्रेरणादायीबाबासाहेबांचे संपूर्ण जीवनचरित्र उलगडणारी दूर्मीळ छायाचित्रे असणारे भव्यतम छायाचित्र दालन हे स्मारकाचे एक विशेष आकर्षण असून येथे बाबासाहेबांच्या जन्माच्या आधीपासून महापरिनिर्वाणापर्यंत विविध महत्वाच्या घटनांचा, प्रसंगांचा व कागदपत्रांचा ऐतिहासिक दस्तऐवज पाहता येणार आहे. प्रत्येक छायाचित्राखाली त्या छायाचित्राविषयीची माहिती मराठी व इंग्रजी भाषेत प्रदर्शित करण्यात आली असून या माध्यमातून बाबासाहेबांचे चरित्र वाचल्याचे समाधानही छायाचित्र बघता बघता नागरिकांना मिळत आहे. त्यामुळे या छायाचित्र दालनातून बाबासाहेबांचा जीवनप्रवास उलगडतोच तसेच त्यापासून प्रेरणाही मिळते अशी भावना तेथे भेट देणारे असंख्य नागरिक व्यक्त करीत असतात.स्मारकात स्पेशल होलोग्राफिक प्रेझेंटेशन शोची व्यवस्था करण्यात आली असून या आभासी चलचित्र प्रणालीव्दारे बाबासाहेबांचे भाषण समोरासमोर ऐकण्याची सुविधा नागरिकांना भारावून टाकते. प्रत्यक्ष बाबासाहेब आपल्याशी बोलतात ही भावना शो बघून झाल्यानंतर नागरिक व्यक्त करीत असतात.

ध्यानकेंद्राच्या माध्यमातून लाभते आत्मिक समाधान – नागरिकांच्या भेटीचा अखंड ओघएकाच वेळी २०० व्यक्ती ध्यान करू शकतील असे भव्य ध्यानकेंद्र स्मारकातील वरच्या भागात असून त्या ठिकाणी ध्यानधारणेचे आनापान सत्र सुरु करण्यात आले आहे. धम्मविपुला केंद्र बेलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली यावर्षीपासून सुरु झालेल्या या ध्यानविषयक आनापान सत्राचा लाभ आत्तापर्यंत ४८ हजार ३२५ नागरिकांनी घेतला आहे. स्मारकात असलेल्या २५० आसन क्षमतेच्या अत्याधुनिक वातानुकुलित सभागृहामध्ये व्याख्याने व इतर प्रबोधनात्मक उपक्रम सातत्याने आयोजित केले जातात.बाबासाहेबांच्या ज्ञानसंपन्नतेचे प्रतीक म्हणून पेनच्या नीबच्या आकाराचा लांबूनच नजरेत भरणारा ५० मीटर उंचीचा भव्य डोम लक्ष वेधून घेतो. यापासूनच स्मारकाच्या वेगळेपणाची नोंद नकळतपणे घेतली जाते.

स्मारकाचे वेगळेपण लक्षात घेऊन याठिकाणी नागरिकांचा ओघ सातत्याने सुरु असतो. स्मारकाला एकदा भेट दिलेले नागरिक याठिकाणी पुन्हा एकवार कुटुंबासह भेट देतातच शिवाय आपल्या परिचितांनाही आवर्जून भेट देण्यास सांगतात. त्यामुळे मागील तीन वर्षांत साधारणत: ३.२५ लाख देशीपरदेशी नागरिकांनी नोंद करून स्मारकाला भेट दिली आहे व येथील व्यवस्था आणि सुविधांचे मुक्तकंठाने कौतुक केले आहे.

चैत्यभूमीवर विशेष स्टॉलव्दारे स्मारकाची माहिती प्रसारित करून ज्ञानस्मारकाला भेट देण्याचे आवाहन बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणदिनी चैत्यभूमी, दादर येथे अभिवादन करण्यासाठी देशापरदेशातून येणाऱ्या नागरिकांना नवी मुंबई महानगरपालिकेच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्ञानस्मारकातील विविध सुविधांची माहिती मिळावी यादृष्टीने चैत्यभूमीवर विशेष स्टॉल लावून ऐरोली, नवी मुंबई येथील ज्ञानस्मारकाची माहिती आकर्षक रितीने प्रदर्शित करण्यात येत आहे. चैत्यभूमीला भेट देणा-या नागरिकांनी मुंबईपासून जवळच असलेल्या या ज्ञानस्मारकालाही भेट दयावी व एक अलौकिक अनुभव आणि संस्मरणीय आठवण सोबत घेऊन जावी असे आवाहन स्टॉलवरून करण्यात येत आहे.

गतवर्षी ६ डिसेंबर रोजी महापरिनिर्वाणदिनी मोठया संख्येने नागरिकांनी नवी मुंबई महानगरपालिकेच्या ऐरोली येथील ज्ञानस्मारकाला भेट दिली होती. यावर्षीही महानगरपालिकेने त्याठिकाणी आवश्यक सर्व सुविधा पूर्तता केली असून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणादायी स्मृतींना वैचारिक अभिवादन करण्यासाठी नागरिकांना मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी केले आहे.

## माजी उपसभापती अरूणा खाकर यांच्या वाढदिवसानिमित्त ५०० मुलांना केळी आणि चिवडा वाटप!



**मुरबाड (आकाश कांबळे)** - मुरबाड तालुक्यातील आदिवासी पट्ट्यात व मुरबाड ग्रामीण भागात सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणाऱ्या अरूणा खाकर यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त जि. प. शाळा.केळेवाडी,वाल्हिवरे,कुंभाळे व अनुदानित आश्रमशाळा वाल्हिवरे येथील ५०० मुलांना केळी व चिवडा वाटप करून आपला वाढदिवस साजरा केला, या वेळी केळेवाडी येथे नानू पोकळा,मारूती खाकर,मोरोशी येथील पोलिस पाटील चंदर भला, आदिवासी समाज संघटना अध्यक्ष रघुनाथ खाकर, तर वाल्हिवरे येथे उपसरपंच किरण आसवले, जि.प. शिक्षक रमेश खाकर, कवडे , सय्यद तसेच आश्रमशाळा वाल्हिवरे येथे मुख्याध्यापक संदिप देशमुख दिनेश लाटे, भालचंद्र भोईर विकास दळवी , संजया खाकर ,महेश भोईर , राठोड, गायकवाड , संतोष मोहपे इत्यादी उपस्थित होते.

## नागरिकांनीच केला काळा तलाव परिसरातील कचरा साफ



**कल्याण (आकाश कांबळे) :** कल्याण पश्चिमेतील काळा तलाव परिसरात कचऱ्यामुळे अस्वच्छता झाली होती. त्यामुळे तलावाच्या ठिकाणी मॉर्निंग वॉक आणि इतर वेळी फिरायला येणाऱ्या नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत होता. शिवाय अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचल्यामुळे परिसरला डम्पिंगचं स्वरूप प्राप्त झालं होतं.

केडीएमसी प्रशासन याकडे पूर्णता दुर्लक्ष करत असल्याने आज काळा तलाव आणि परिसरात मॉर्निंग वॉकला येणाऱ्या नागरिकांनी हा कचरा मुख्य गेट वरतीच आणून टाकत याचा निषेध व्यक्त केला. जोपर्यंत कचरा रोज साफ होत नाही तोपर्यंत गेटवरील कचरा उचलू देणार नाही अशी भूमिका घेतली. अखेर महापालिकेचे अधिकारी यांनी आश्वासन दिल्यानंतर कसा उचलून नेण्यात आला. शिवाय दररोज कचरा साफ झाला नाही तर केडीएमसी मुख्यालयाच्या बाहेर हा कचरा आणून टाकू असा इशारा नागरिकांनी दिला आहे .

## शाडुच्या श्री गणेश मूर्ती बनविण्याच्या केडीएमसीच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद द्यावा - केडीएमसी उपायुक्त अतुल पाटील

**कल्याण (विवेक गुंजाळ)** : पर्यावरण पूरक म्हणजेच शाडुच्या श्री गणेश मूर्ती बनविण्याबाबत कल्याण डोंबिवली महापालिकेने केलेल्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद द्यावा, असे प्रतिपादन पर्यावरण व प्रदुषण नियंत्रण विभागाचे उपआयुक्त अतुल पाटील यांनी केले. फेब्रुवारी मध्ये असणा-या माघी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महापालिका कार्यक्षेत्रातील कारखानदार, मूर्ती विक्रेते, मूर्तीकार यांच्या समवेत महापालिकेच्या आचार्य अत्रे रंगमंदिरात संपन्न झालेल्या बैठकीत बोलताना त्यांनी हे प्रतिपादन केले.

पीओपी च्या मूर्ती पाण्यामध्ये विरघळत नाहीत, परिणामी जलस्त्रोतातील प्रदुषणात वाढ होवून पर्यावरणाचे संतुलन बिघडते. त्यामुळे केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ, दिल्ली यांच्याकडील दि. १२ मे २०२० रोजीच्या सुधारीत मार्गदर्शक तत्वानुसार नदी, खाडीचे प्रदुषण व नुकसान टाळण्यासाठी केंद्र सरकारने पीओपी च्या मूर्तीवर बंदी जाहीर केली आहे. या अनुषंगाने महापालिका क्षेत्रामध्ये पीओपी च्या वापरावर (मूर्ती बनविणे) बंदी घालण्यासंदर्भात





या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पर्यावरण व प्रदुषण नियंत्रण विभागाचे कार्यकारी अभियंता प्रमोद मोरे, पर्यावरण दक्षता मंडळाच्या रुपाली शाईवाले, पुनरावर्तन संस्थेच्या मयुरी कुंभार, मनुश्रुष्टि पर्यावरण समंत्रक वैशाली तांबट आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

कल्याण हे प्रामुख्याने रेसिडेन्सीयल हब आहे. मुंबईत दररोज जाणारे असंख्य चाकरमानी कल्याण मध्ये राहतात, त्यामुळे येथील पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी पीओपीच्या मूर्ती बनविण्यावर पूर्णपणे बंदी घालावी, असे आवाहन पर्यावरण व प्रदुषण नियंत्रण विभागाचे उपआयुक्त अतुल पाटील यांनी या बैठकीत केले.

महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांच्या निर्देशानुसार शाडू मातीच्या मूर्ती बनविण्यासाठी मूर्तीकारांना जागा व माती महापालिकेमार्फत विनामुल्य उपलब्ध दिली जाईल. सप्टेंबर २०२४ पर्यंत एकूण ७२ मूर्तीकारांना तसेच अनेक संस्थांना महापालिकेमार्फत ५० टन शाडू मातीचे विनामुल्य वाटप करण्यात आले आहे, अशी माहिती पर्यावरण व प्रदुषण नियंत्रण विभागाचे कार्यकारी अभियंता प्रमोद मोरे यांनी दिली.

पुनरावर्तन संस्थेच्या मयुरी कुंभार तसेच पर्यावरण दक्षता मंडळाच्या रुपाली शाईवाले यांनीही यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच मनुश्रुष्टि पर्यावरण समंत्रक वैशाली तांबट यांनी सिपीसीबी गाईड लाईन्स , उच्च न्यायालयाच्या मनाईनुसार पीओपी बंदी, वायुप्रदूषण व जलप्रदूषण, बाबत सविस्तर माहितीवजा प्रेझेंटेशन सादर करून उपस्थितांना मार्गदर्शन केले. बैठकीत उपस्थित असलेल्या मूर्तीकारांनी महापालिकेच्या या उपक्रमास उत्स्फुर्त प्रतिसाद दर्शविला.

## कार्ला एकविरा गडावर रविवारी साजरा होणार `एक दिवस कायस्थांचा' सोहळा

### एकविरा देवी उत्सवाला सीकेपी बांधवांचा भरभरुन प्रतिसाद

**कल्याण (गणेश बागडे) :** गेली काही वर्षे सीकेपी समाजात लोकप्रिय ठरलेला कार्ला एकविरा गडावरील `एक दिवस कायस्थांचा' उत्सव रविवारी ८ डिसेंबर रोजी होणार आहे. या उत्सवासाठी राज्य व देशातून समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

गेली ८/९ वर्षे `एक दिवस कायस्थांचा' एकविरा गडावर साजरा केला जातो. दरवर्षी उत्सवाची चढती कमान असते. यावर्षीही एक दिवस कायस्थांच्या सोहळयात विविध कार्यव्रâमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात प्रामुख्याने एकविरा देवीचा होम करण्यात येणार असून या होमासाठी ज्ञातीतील जोडप्यांचा सहभाग असणार आहे. शिवाय महाआरती, पालखी, स्मरणिका प्रकाशन, भजन-किर्तन, भारुड इत्यांदी अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी होणारा कार्यक्रम एकविरा गडाच्या पायथ्याशी असलेल्या स्वप्नपूर्ती बंगला परिसरात करण्यात येणार आहे.

कार्ला येथील एकविरा देवी प्रामुख्याने सीकेपी, आगरी, कोळी व दैवज्ञ सोनार समाजाची म्हणून ओळखली जाते. नवसाला पावणारी देवी अशी श्रध्दा या समाजाची आहे. पूर्वी म्हणजे १८व्या शतकात एकविरा गडावर सीकेपी समाजाची धर्मशाळा होती. तसेच समाजातील मंडळींचा मोठा राबता होता. परंतु काळाच्या ओघात हे सर्व मागे पडले म्हणूनच सीकेपी संस्थेने `एक दिवस कायस्थांचा' हा अभिनव कार्यव्रâम सुरु केला आणि देशभरातील सीकेपी बांधवांनी या कार्यव्रâमाला उत्स्फूर्त पाठींबा दिला.यावर्षी म्हणजे ८ डिसेंबर रोजी होणार्या कार्यक्रमास ज्ञाती बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

यावर्षीचा कार्यक्रम सीकेपी समाजातील चार संस्था एकत्र येवून करीत आहेत. सीकेपी संस्था, कायस्थ प्रभू उत्कर्ष संस्था, पुणे सीकेपी फॅमेली ट्रस्ट, धर्मवीर आनंद दिघे विचार मंच इत्यांदीं संस्थांचा पुढाकार आहे. `एक दिवस कायस्थांच्या कार्यक्रमाला कायमस्वरुपी भव्य स्वरुप यावे म्हणून देवीच्या नावाने विश्वस्त संस्था स्थापन करुन आगामी वर्षापासून उत्सव सोहळा होणार असल्याची माहिती देण्यात आली. उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन सीकेपी ज्ञातीतील विविध संस्थांतर्फे विकास देशमुख, स्वप्निल प्रधान, मिलिंद मथुरे, जयदिप कोरडे, निलेश गुप्ते, तुषार राजे आदींनी केले आहे.

## डोंबिवलीतील ५८ बेकायदा इमारती रिकाम्या करण्याच्या नोटिसा

**डोंबिवली(प्रथमेश चव्हाण)** – डोंबिवलीत बेकायदा इमारती उभारून या इमारतींना महारेराचा नोंदणी क्रमांक मिळवून, या बेकायदा इमारती अधिकृत असल्याचे दाखवून घर खरेदीदारांची फसवणूक करणाऱ्या डोंबिवलीतील ह, ग, फ, ई आणि आय प्रभागातील बेकायदा ५८ इमारतींमधील रहिवाशांना इमारती रिकाम्या करण्याच्या, त्या जमीनदोस्त करण्याच्या नोटिसा साहाय्यक आयुक्तांनी देण्यास सुरुवात केली आहे. या नोटिसांमुळे या बेकायदा इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांमध्ये खळबळ उडाली आहे. डोंबिवलीतील ६५ बेकायदा इमारती तीन महिन्यांच्या आत जमीनदोस्त करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमोल बोरकर यांनी दिले आहेत. या इमारती अधिकृत असल्याचे दाखवून या इमारतींमधील घरे रहिवाशांना विकली आहेत. अशाप्रकारचे यापुढे होणारे प्रकार रोखण्यासाठी वास्तुविशारद संदीप पाटील यांनी या बेकायदा इमारतींवर कारवाई करण्यासाठी चार वर्षांपासून पालिकेकडे तगादा लावला होता. पालिकेकडून कारवाई होत नसल्याने वास्तुविशारद पाटील यांनी याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. याचिका दाखल होताच पालिकेने ६५ इमारतीच्या विकासकांविरुद्ध मानपाडा, रामनगर पोलीस ठाण्यात तीन वर्षांपूर्वी गुन्हे दाखल केले.

## प्राथमिक आरोग्य केंद्र बदलापूर येथे सीवाय टिबी टेस्ट या मोहिमेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते उद्घाटन



**ठाणे (रोहित जैसवाल)** - प्राथमिक आरोग्य केंद्र बदलापूर येथे राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम अंतर्गत दि. ४ डिसेंबर, २०२४ रोजी सुप्त अवस्थेतील क्षयरोगाचे लवकरात लवकर निदान होण्यासाठी सीवाय टिबी (CY TB) टेस्ट या मोहिमेचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. या चाचणी मुळे जास्तीत जास्त संशयित क्षयरुग्णांचे खात्रीपूर्वक निदान करून क्षयरोगातून पूर्ण बरे करण्यास मदत मिळणार आहे अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी दिली.

यावेळी जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. स्वाती पाटील, जिल्हा समाज कल्याण अधिकारी उज्वला सपकाळे, जिल्हा क्षयरोग वैद्यकीय अधिकारी डॉ. तरुलता धानके, डॉ. अर्चना मोहिते, तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती अंबरनाथ डॉ. प्रशांत कनोजा, वैद्यकीय अधिकारी प्रा. आ. केंद्र बदलापूर डॉ. अश्विनी वाणे, वैद्यकीय अधिकारी प्रा. आ. केंद्र बदलापूर डॉ. केतकी गायकवाड तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. आशा स्वयंसेविका नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र बदलापूर संजीवनी पाटील यांनी रेखाटलेली आरोग्य शिक्षणपर रांगोळी कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले.

# अभिनेता नागा चैतन्य आणि अभिनेत्री शोभिता धुलिपाला अखेर लग्नबंधनात

दाक्षिणात्य अभिनेता नागा चैतन्य आणि अभिनेत्री शोभिता धुलिपाला अखेर लग्नबंधनात अडकले आहेत. बऱ्याच दिवसांपासून चर्चेत असलेला विवाहसोहळा अखेर काल ४ डिसेंबर २०२४ रोजी पार पडला. हैदराबादच्या अन्नपूर्णा स्टुडिओमध्ये मोठ्या थाटामाटात हा लग्नसोहळा आयोजित करण्यात आला होता. नागा चैतन्य आणि शोभिताला आशिर्वाद देण्यासाठी तेलुगू इंडस्ट्रीमधली अनेक दिग्गज मंडळी उपस्थित होती.



नागा चैतन्य आणि शोभिता धुलिपाला यांच्या लग्नाच्या विधीचे फोटो आणि व्हिडीओ समोर आले असून सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाले आहेत. लग्न मंडपातील एक सुंदर व्हिडीओ समोर आला आहे. ज्यामध्ये शोभिताच्या गळयात मंगळसुत्र बांधताना नागा चैतन्य दिसतोय. यावेळी वर, वधू आणि कुटुंबीय आनंदात असल्याचच पाहायला मिळतेय.

नागा चैतन्य आणि शोभिता हे दोघेही एकत्र खूप सुंदर दिसत असून दोघांची केमिस्ट्री चाहत्यांना खूप आवडलीये. लग्नात केसांपासून ते पायपर्यंत नखशिखांत सजलेली शोभिता अतिशय सुंदर दिसत होती. तर ऑफ व्हाईट कलरच्या ट्रॅडिशनल ड्रेसमध्ये नागा चैतन्यही एखाद्या राजकुमारासारखा दिसत होता.



# हृतिक रोशनचा गर्लफ्रेंड सबा आझादवर प्रेमाचा वर्षाव

बॉलिवूडचा ग्रीक गॉड हृतिक रोशन प्रोफेशनल लाइफपेक्षा खासगी आयुष्यामुळे चर्चेत येत असतो. ते दोघे सोशल मीडियावर एकमेकांसाठी पोस्ट शेअर करताना दिसतात. हृतिक गर्लफ्रेंड सबा आजाद चा प्रोत्साहन देण्यासाठी कोणतीच कसर सोडत नाही. दरम्यान अभिनेत्याने सबासाठी एक छान व्हिडीओ शेअर केला आहे. ज्यात ती गाताना दिसते आहे.

हृतिक रोशनने नुकतेच सबाला चिअरअप करण्यासाठी इंस्टाग्राम हॅण्डलवर तिच्या गाण्याचा एक व्हिडीओ शेअर केला आणि या पोस्टसोबत कॅप्शनमध्ये लिहिले की, किलिंग इट. या व्हिडीओत पाहायला मिळत आहे की, अभिनेत्री लाइव्ह शोदरम्यान गाताना आणि नाचताना दिसते आहे. हे पहिल्यांदा नाही घडत आहे की हृतिक सबाचं कौतुक करतो आहे. तो नेहमी सोशल मीडियावर तिच्यासाठी छान मेसेज देत असतो. मागील महिन्यात हृतिकने सबाच्या वाढदिवसानिमित्त पोस्ट शेअर केली होती. वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना अभिनेत्याने छान फोटो शेअर केले होते.

हृतिक आणि सबाची प्रेमकहाणी २०२२ मध्ये सुरू झाली. रिपोर्ट्सनुसार, हे जोडपे पहिल्यांदा ट्विटरवर कनेक्ट झाले जेव्हा अभिनेत्याने सबा आणि रॅपरचा व्हिडिओ लाइक केला आणि शेअर केला. सबाने थँक्स मेसेजला रिप्लाय दिला, तिथून दोघांमध्ये संवाद सुरू झाला. फेब्रुवारी २०२२ मध्ये डिनर डेट दरम्यान ते पहिल्यांदा एकत्र दिसले होते. त्याच वर्षी नंतर ते करण जोहरच्या ५०व्या वाढदिवसाला एकत्र दिसले. हृतिकच्या वर्कफ्रंटबद्दल सांगायचं तर तो लवकरच अयान मुखर्जी दिग्दर्शित 'वॉर २' या ॲक्शन ड्रामामध्ये दिसणार आहे.

# लाडक्या लेकाने शशांक-प्रियांकाच्या लग्नाचा वाढदिवस बनवला खास




शशांक केतकर हा मराठी मालिकाविश्वातील लोकप्रिय अभिनेता आहे. वेगवेगळ्या मालिका, चित्रपट तसेच नाटकांमधून काम करत त्याने आपल्या अभिनयाचा ठसा प्रेक्षकांच्या मनावर उमटवला. सध्या शशांक स्टार प्रवाह वाहिनीवरील 'मुरांबा' मालिकेत मुख्य भूमिकेत पाहायला मिळतो आहे. शशांक त्याच्या अभिनयाबरोबरच वैयक्तिक आयुष्यामुळेही चर्चेत येत असतो. सोशल मीडियावरही तो बेधडकपणे आपलं मत मांडताना दिसतो. काल ४ डिसेंबरच्या दिवशी अभिनेत्याने त्याच्या लग्नाचा वाढदिवस साजरा केला. सोशल मीडियावर खास पोस्ट करत त्याने लाडक्या बायकोला शुभेच्छाही दिल्या. शशांक आणि प्रियांकाच्या सुखी संसाराला ७ वर्ष पूर्ण झाली. परंतु कालचा दिवस शशांक आणि त्याची पत्नी प्रियांकासाठी त्यांच्या मुलाने खास बनवला. याचा व्हिडीओ शशांकने सोशल मीडियावर पोस्ट केला आहे. या व्हिडीओने चाहत्यांचं लक्ष वेधून घेतलंय.

शशांक केतकरने सोशल मीडियावर शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये दिसतंय, एका टेबलवर केक ठेवलेला असून त्यावर प्रिशा असं नाव लिहलेलं आहे. या व्हिडीओमध्ये शशांकच्या मुलाचे बोबडे बोल ऐकू येत आहेत. त्यावेळी तो म्हणतो, "हे आई-बाबा आहेत. त्यांची ॲनिव्हर्सरी आहे, म्हणून हा चॉकलेट केक त्यांच्यासाठी आणला आहे." सोशल मीडियावर अभिनेत्याने हा व्हिडीओ पोस्ट करत त्याच्या कॅप्शनमध्ये लिहलंय की, "आमची ॲनिव्हर्सरी या पेक्षा गोड नोटवर संपूच शकत नाही! आम्हा दोघांनाही भरभरून शुभेच्छा आणि प्रेम देणाऱ्या सगळ्यांना मनापासून थँक्यू."

दरम्यान, २०१७ मध्ये शशांक केतकरने प्रियांका ढवळेसोबत लग्नगाठ बांधली. शशांक-प्रियांकाच्या या सुखी संसाराला ७ वर्ष पूर्ण झाली आहेत. शशांक केतकरने सोशल मीडियावर शेअर केलेल्या व्हिडीओवर मराठी कलाकार मंडळींनीही आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत.

# 'पुष्पा २' च्या निर्मात्यांना मोठा धक्का

## प्रदर्शनानंतर अवघ्या काही तासांत 'या' प्लॅटफॉर्म्सवर लीक झाला चित्रपट

सुकुमार यांनी दिग्दर्शित केलेला 'पुष्पा २' हा चित्रपट आज रिलीज झाला. अल्लू अर्जुन आणि रश्मिका मंदान्ना स्टारर चित्रपटाला चांगला प्रतिसाद मिळतोय. लोक सोशल मीडियावर चित्रटाचा रिव्हू करत आहेत. पण आता या चित्रपटाशी संबंधित एक मोठी बातमी समोर येत आहे. ही बातमी निर्मात्यांना काळजीत टाकणारी आहे. कारण हा ॲक्शन थ्रिलर चित्रपट ऑनलाइन लीक झाला आहे.

**ऑनलाइन लीक झाला चित्रपट**




ब्लॉकबस्टर 'पुष्पा' सिनेमाचा दुसरा भाग 'पुष्पा २' अखेर तीन वर्षांनी आज प्रदर्शित झाला आहे. सगळीकडे अल्लू अर्जुन व रश्मिका मंदानाच्या या चित्रपटाचीच चर्चा पाहायला मिळत आहे. प्रेक्षक हा चित्रपट पाहण्यासाठी गर्दी करत आहेत. अशातच एक निर्मात्यांसाठी एक वाईट बातमी आहे. हा चित्रपट ऑनलाइन लीक झाला आहे.


'पुष्पा २' चित्रपट आज ५ डिसेंबर रोजी सकाळी प्रदर्शित झाला. चित्रपटाचे अवघे काही शो झाली आहेत, याचदरम्यान हा चित्रपट ऑनलाइन लीक झाला आहे. 'पुष्पा २' हा २०२१ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'पुष्पा द राइज' या चित्रपटाचा सिक्वेल आहे. पहिला भाग ब्लॉकबस्टर झाल्यावर निर्मात्यांनी दुसऱ्या भागाची घोषणा केली होती. प्रदर्शनाची तारीख अनेकदा पुढे ढकलल्यानंतर अखेर हा सिनेमा चित्रपटगृहांमध्ये दाखल झाला. एकीकडे लोकांमध्ये या चित्रपटाची तुफान क्रेझ आहे, तर दुसरीकडे हा चित्रपट लीक झाला आहे.

चित्रपट रिलीजच्या पहिल्याच दिवशी अवघ्या काही तासांतच लीक झाल्याने निर्मात्यांना मोठा धक्का बसू शकतो. 'पुष्पा २' रिलीज झाल्यानंतर पायरसी प्लॅटफॉर्मवर ऑनलाइन लीक झाला आहे. आता लोक हा सिनेमा मोफत डाउनलोड करून पाहू शकतात. हा सिनेमा पायरसी प्लॅटफॉर्मवर 1080p, 720p, 480p, 360p, 240p, HD मध्ये लीक झाला आहे.

# सूरज चव्हाणला पाहून शाळेतली विद्यार्थिनी झाली भावुक



बिग बॉस मराठीच्या पाचव्या पर्वाचा विजेता सूरज चव्हाणणे लाखो चाहत्यांच्या मनात स्वत:चं हक्काचं स्थान मिळवलं आहे. सूरजच्या साध्या भोळया स्वभावावर महाराष्ट्रातील जनतेने भरभरून प्रेम केलं आहे. बिग बॉसची ट्रॉफी त्याने जिंकल्यावर प्रत्येक व्यक्तीने आणि सामान्य माणसाने जल्लोष केला. त्यानंतर आता सूरजला पाहण्यासाठी त्याला भेटण्यासाठी चाहते फार उत्सुक आहेत. सूरजला अनेक ठिकाणी कार्यक्रमांमध्ये आमंत्रित केलं जात आहे. त्याने आतापर्यंत अनेक शाळांनाही भेट दिली आहे. सूरजने गुलीगत रील व्हिडीओ बनवून मोठी प्रसिद्धी मिळवली. काही दिवसांपूर्वीच त्याने एका शाळेला भेट दिली होती. त्यावेळी त्याला पाहून शाळेतील विद्यार्थ्यांनी सूरज...सूरज असं म्हणत एकच कल्ला केला होता. तो व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला होता. लहान मुलांपासून ते अगदी वयोवृद्ध व्यक्तींपर्यंत प्रत्येकाच्या मनात सूरजविषयी आदर आणि सन्मान निर्माण झाला आहे.



# अभिनयातून ब्रेक जाहीर केल्यानंतर तीनच दिवसांनी शूटिंग सेटवर पोहोचला विक्रांत मॅसी

अभिनेता विक्रांत मॅसीनं अलीकडेच अभिनयातून ब्रेक घेण्याची घोषणा केली होती. विक्रांतच्या या निर्णयानंतर त्याच्या चाहत्यांमध्ये गोंधळाचं वातावरण निर्माण झालं. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'द साबरमती रिपोर्ट' या चित्रपटादरम्यान विक्रांतनं अभिनयातून विश्रांती घेण्याची घोषणा केली होती. त्याच्या या निर्णयाचा वेगळा अर्थ लावण्यात आला. कुटुंबाबरोबर वेळ घालवण्यासाठी काही काळ अभिनयाला विश्रांती देण्याचा तो विचार करत होता. मात्र तो अभिनयातून कायमचा बाजूला जाणार असल्याच्या अफवा पसरल्या. नंतर त्यानं याचा खुलासा करुन आपल्या म्हणण्याचा विपर्यास केला गेल्याचं सांगितलं होतं.

विक्रांत पुन्हा कधीपासून काम करणार या अपडेटकडेसाठी आतुर असलेल्या त्याच्या चाहत्यांना अस्वस्थ वाटत होतं. विक्रांत किती काळ कामापासून दूर राहणार याविषयी चिंता व्यक्त केली जात होती. आता विक्रांत शनाया कपूरसोबत डेहराडूनमध्ये शूटिंगवर दिसला आहे. त्यामुळे आपला आवडता स्टार परत आल्यानं विक्रांतचे चाहते आनंदी झाले आहेत.

# क्रिकेटरच्या प्रेमात राशा थडानी!

सिनेसृष्टीत कलाकारांसोबत त्यांच्या मुलांचीही चर्चा रंगलेल असते. ते नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत येत असतात. अशातच अभिनेत्री रवीना टंडन हिची लेक राशा थडानी चर्चेत आली आहे. राशाही बॉलीवूडमध्ये पदार्पण करणार असली, तरी अजूनही तिला बराच पल्ला गाठायचा आहे. आता राशा तिच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत आली आहे. तिचे नाव एका लोकप्रिय भारतीय क्रिकेटपटूसोबत जोडले जात आहे. तो क्रिकेटर म्हणजे २९ वर्षीय स्पिनर कुलदीप यादव आहे. राशाची सोशल मीडिया पोस्ट लाईक केल्यामुळे दोघांच्या नात्याची चर्चा रंगली आहे.



राशाने बॉलीवूड अभिनेत्री तमन्ना भाटिया आणि डायना पेंटीसोबत काही फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. त्यांच्या फोटोंवर कुलदीपने लाईक केले आहे. इन्स्टाग्रामवर कुलदीप आणि राशा एकमेकांना फॉलोही करतात. यामुळेच दोघांच्या नात्याची चर्चा रंगली आहे. पण, या चर्चांवर राशा अथवा कुलदीपने अद्यापही अधिकृतरीत्या भाष्य केलेले नाही. दोघांनीही यावर मौन बाळगले आहे. राशा लवकरच बॉलीवूडमध्ये पदार्पण करणार आहे. 'आझाद' या सिनेमात ती झळकणार आहे. या सिनेमात सिंघम अजय देवगण प्रमुख भूमिकेत असणार आहे.

# 'हॅशटॅग तदेव लग्नम'चा जबरदस्त ट्रेलर प्रदर्शित

शुभम फिल्म प्रॉडक्शन प्रस्तुत 'हॅशटॅग तदेव लग्नम्' चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला असून, ट्रेलर पाहून या चित्रपटाबद्दलची प्रेक्षकांच्या मनातील उत्सुकता आता प्रचंड वाढली आहे. खरंतर टिझर प्रेक्षकांच्या भेटीला आल्यापासूनच या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांच्या मनात कुतूहल होते. 'लग्न'संस्थेबाबतचे आधुनिक काळाचे विचार अतिशय हलक्याफुलक्या आणि मजेशीर पद्धतीने या चित्रपटात मांडण्यात आल्याचे टिझरमध्ये दिसत होते. आता ट्रेलर पाहून या चित्रपटाच्या दुसऱ्याही अनेक बाबी समोर आल्या आहेत. या सगळ्या गोष्टी असतानाच 'हॅशटॅग तदेव लग्नम्'च्या निमित्ताने सुबोध भावे आणि तेजश्री प्रधान ही जोडीही पहिल्यांदाच पडद्यावर झळकणार आहे. याव्यतिरिक्त यात प्रदीप वेलणकर, मानसी मागिकर, संजय खापरे, शर्मिष्ठा राऊत यांच्याही भूमिका आहेत. त्यामुळे एकंदरच हा



चित्रपट प्रेक्षकांच्या मनात घर करणार असल्याचे दिसतेय. आनंद दिलीप गोखले लिखित, दिग्दर्शित या चित्रपटाचे शेखर विठ्ठल मते निर्माते आहेत.

ट्रेलरमध्ये अथश्री आणि गायत्री ही दोन परस्पर विरोधी व्यक्तिमत्वं त्यांच्या लग्नासाठी एकमेकांना पहिल्यांदा भेटताना दिसत असून या दरम्यान काही गंमतीशीर घटना घडताना दिसत आहेत. दोघांचे विचार एकमेकांसोबत शेअर करत असतानाच त्यांच्या आयुष्यातील काही रहस्येही समोर येत आहेत. त्यामुळे यात धमाल तर आहेच तसेच काही ट्विस्टही अनुभवायला मिळणार आहेत. या सगळ्यातून अथश्री आणि गायत्री यांचे लग्न होणार का? हे पाहण्यासाठी प्रेक्षकांना २० डिसेंबरपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे.

चित्रपटाचे दिग्दर्शक आनंद दिलीप गोखले म्हणतात, "आजच्या काळात लग्न करताना एकमेकांत बघितल्या जाणाऱ्या गोष्टींवर प्रकाश टाकणारा हा चित्रपट आहे. लग्न करताना आता तरुणांची विचारसरणी बदलली आहे, त्यांचा लग्नाकडे पाहण्याचा दृष्टीकोन खूप वेगळा झाला आहे. हा सिनेमा तरुणांना विशेष जवळचा वाटेल. असे असले तरी संपूर्ण कुटुंबाने एकत्र पाहावा, असा हा चित्रपट आहे. यात मजा, धमाल तर आहेच प्रसंगी प्रेक्षकांना हळवाही बनवेल. कथानकात सुबोध आणि तेजश्रीच्या जबरदस्त अभिनयाने अधिकच रंगत आणली आहे." निर्माते शेखर मते म्हणतात, ''विषय थोडा नाजूक असला तरी अतिशय मजेशीर पद्धतीने तो यात मांडण्यात आला आहे. प्रेक्षकांना हा चित्रपट नक्कीच आवडेल.




**मेष** – नव्या खरेदीचा मोह टाळा. मानसिक उत्साह जाणवेल. तुम्ही केलेले प्रयत्न यशस्वी होतील. प्रगतीचा नवा मार्ग शोधणे शक्य होईल.

**वृषभ** – आपल्या घरातील वडीलधाऱ्यांच्या सल्ल्याचे पालन करा. व्यवहारात अत्यंत चाणाक्ष राहावे लागेल. प्रवासात कधीही घाई करू नका.

**मिथुन** – वैवाहिक जीवनात सुख समाधान नांदेल. आर्थिक व्यवहार करताना सावध राहा. तुमचा आत्मविश्वास वाढेल. कलेत मन रमेल.

**कर्क** – आपल्या कार्यपद्धतीत योग्य तो बदल करा. आपल्या जबाबदारीत वाढ होणार आहे. आर्थिक लाभ होईल. प्रतिष्ठा सांभाळता येईल.

**सिंह** – आपल्याकडून कुणाचा अवमान होणार नाही याची काळजी घ्या. आपल्या आर्थिक व्यवहारास चालना मिळेल. धंद्यात वाढ होईल.

**कन्या** – विरोधकांना आपल्या बाजूने वळवता येईल. आर्थिक लाभाचे योग येतील. तुम्ही हाती घेतलेल्या कार्यास योग्य गती प्राप्त होईल.

**तूळ** – नोकरीधंद्यातील अधिकाराचा योग्य वापर करा. आरोग्याच्या तक्रारी जाणवतील. प्रगतीचे संकेत मनास समाधान प्रदान करतील.

**वृश्चिक** – घरातील कामे होतील. क्षुल्लक ताणतणावाचा सामना करावा लागेल. आपल्या श्रमाचे योग्य मूल्यांकन केले जाईल. संयम राखा.

**धनु** – धंद्यातील चर्चा संयमाने करा. मन स्थिर ठेवता येईल. वाहन जपून चालवा. प्रतिष्ठित व्यक्तींची ओळख होईल. गैरसमज दूर होईल.

**मकर** – वरिष्ठ खूश होतील. महत्त्वाचे काम रेंगाळत ठेवू नका. योग्य निर्णय घेता येईल. जबाबदारीचे पालन करण्याकडे दुर्लक्ष करू नका.

**कुंभ** – आर्थिक व्यवहारात लाभाचे योग येतील. बुद्धिचातुर्याने कामास गती प्राप्त होईल. आप्तेष्टांना मदत करावी लागेल. नोकरीत काम वाढेल.

**मीन** – बोलताना वाहवत जाऊ नका. आर्थिक व्यवहारात तज्ज्ञांचे मार्गदर्शन घ्या. वरिष्ठांचा पाठिंबा आपल्या मनास समाधान प्रदान करेल.

## दोन-दोन गुन्हे दाखल असताना मिळकतखार खाडीकिनारी पुन्हा अनधिकृत भराव

**अलिबाग (दिगंबर जाधव)** - अलिबाग तालुक्यांतील रेवस बंदराजवळील मिळकतखार येथील खाडीमध्ये बेकायदेशीर भरावाचे प्रकरण गेली १० वर्षे गाजत आहे. प्रत्येक वेळी धनदांडगे कांदळवनांवर, सी.आर. झेड मध्ये नो-डेव्हलपमेंट क्षेत्रात बेकायदार भराव करण्याची सुरूवात करतात व ग्रामस्थांसह काही सामाजिक कार्यकर्ते एकत्र येवून हे काम थांबवितात. पर्यावरण रक्षणसाठी तसेच भविष्यात होणा-या पुरस्थितीतीपासून गावे वाचविण्यासाठी ग्रामस्थ जिवाची बाजी लावून हे बेकायदार काम थांबवितात परंतु सरकारी यंत्रणा व लोकप्रतिनीधी मात्र वारंवार या गंभीर परिस्थतीकडे दुर्लक्ष करीत असल्याचे चित्र दिसून येत



असल्याने ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत आहे. गेल्या दहा वर्षात सन २०१४ व सन २०२२ मध्ये दोन गुन्हे सबंधीतांविरूध्द मांडवा सागरी पोलीस ठाण्यात दाखल असूनही धनदांडगे पुन्हा पुन्हा या ठिकाण भराव करून खाडीकिनारील गावे बुडवायला निघाले आहेत असा थेट आरोप अलिबाग येथील संजय सावंत यांनी केला आहे. अलिबागचे तहसिलदार विक्रम पाटील यांची भेट घेवून त्यांना या प्रकाराबाबत कल्पना दिली. ग्रामस्थांनी दोनच दिवसांपूर्वी आपल्या कार्यालयाकडे तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडे तक्रार केली आहे असे सांगितले. त्यावर तहसिलदार यांनी संबधीत मंडळ अधिकारी व तलाठी यांना योग्य त्या सूचना देण्यांत आल्या आहेत असे सावंत यांना आश्वासीत केले. अलिबाग तालुक्यांतील रेवस बंदराजवळील मिळकतखार येथील खाडीमध्ये बेकायदेशीर भराव केल्या प्रकरणी मांडवा सागरी पोलीस ठाण्यात वासवानी रिसॉर्ट तर्फे कार्यकारी संचालक यांच्यावर सन २०१४ मध्ये गुन्हा दाखल असताना याच जागेत पुन्हा माती भराव सुरू झाला असून याबाबत अलिबाग येथील सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी कोकण आयुक्तांकडे तक्रार दाखल केली होती.

# आता पिंपरी-चिंचवडकरांना मिळणार हवामान बदलाची इत्यंभूत माहिती

**पिंपरी (सुचिता देशमुख) :** पिंपरी-चिंचवड शहराचे बदलते हवामान, प्रदूषण व्यवस्थापन, नैसर्गिक आपत्तीची पूर्वसूचना व त्यांचे परिणाम, आपत्ती व्यवस्थापन करताना राबविल्या जाणाऱ्या उपाययोजना याबाबत माहितीची देवाण घेवाण करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका आणि भारतीय हवामान विज्ञान विभाग (आयएमडी) यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे. हवामान बदलातील विविध आव्हाने सक्षमपणे हाताळण्यासाठी हा करार महत्वपूर्ण ठरणार आहे. निगडी येथील दुर्गादेवी टेकडी येथे हवामान बदलाचे संकेत देणारा अत्याधुनिक एक्स-बॅंड डॉप्लर वेदर रडार मनोरा उभारण्यात येणार आहे. याठिकाणी निश्चित केलेल्या जागेची पाहणी महापालिका



आयुक्त शेखर सिंह आणि पुणे येथील भारतीय हवामान विज्ञान विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ के.एस. होसाळीकर यांनी केली. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, उद्यान अधीक्षक योगेश वाळूंज तसेच भारतीय हवामान विज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ उदय शेंडे, डॉ. शिजो झकारिया, अश्विन राजू डी.के आदी उपस्थित होते. रडार प्रणाली उभारण्यासाठी महापालिकेद्वारे जागा उपलब्ध करून देण्यात आली असून हवामान विभागामार्फत त्या ठिकाणी रडार उभारण्यात येणार आहे. जागतिक स्तरावरील हवामान झपाट्याने बदलत आहे. त्यामुळे नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्ती येण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. बदलते हवामान आणि त्यामुळे उद्भवणारी आपत्ती यावर संरचनात्मक उपाय योजना करण्यासाठी तसेच शहराच्या शाश्वत विकासासाठी हवामान व वातावरणीय बदलाच्या माहितीचे आदान प्रदान करण्यासाठी दोन्ही संस्थामध्ये झालेला सामंजस्य करार भविष्याच्या दृष्टीने महत्वाचा ठरणार असल्याचे आयुक्त सिंह यांनी सांगितले.

SPORT

## Megan Schutt's 5/19 Headlines Australia's 5-Wicket Win Over India In Women's ODI Series Opener

**New Delhi** - India put up a dismal show with the bat as Australia stamped their superiority over the visitors with a five-wicket win in the first Women's ODI here on Thursday.

Opting to bat, India collapsed to 100 all out in 34.2 overs with Australia pacer Megan Schutt returning an impressive five-wicket haul.

Australia did experience a minor stutter in the run chase, when Renuka Thakur struck twice in the same over, before coasting to victory in 16.2 overs.

Debutant opener Georgia Voll (46 not out off 42 balls) produced a measured knock to ensure a comfortable win. Her effort included a six off Renuka in the cow corner region.

Her opening partner Phoebe



Litchfield (35 off 29 balls) was the aggressor in their 48-run stand, smashing six fours in a row, four of those coming off Renuka and two off debutant pacer Titas Sadhu.

The second ODI will be played at the Allan Border Field here on December 8.

Jemimah Rodrigues, who batted at number five, top-scored for India with a 23 off 42 balls.

Opting to bat, India failed to get off the blocks, losing the openers in the first seven overs. Priya Punia (3 off 17), playing in place of the dropped Shafali Verma, looked totally out of sorts in her comeback game.

Smriti Mandha (8 off 9) was caught behind, chasing a wide outswinger from Schutt. Punia, in her attempt to break the shackles, was caught at backward point off Schutt.

Skipper Harmanpreet Kaur (23 off 42) was trapped in front by pacer Annabel Sutherland. Rodrigues looked comfortable in the middle until she was bowled by Kim Grath as she tried to run a delivery down to the third man.

From 62 for three, India were all out for 100 in 34.2 overs. Their last three batters got out with the score reading 100 on the board.

Schutt completed her maiden five wicket haul by castling Priya Mishra.

It was a batting performance to forget for India.

## Bhuvneshwar Kumar Takes Hat-Trick In UP's 10-Run Win Over Jharkhand



**Jharkhand** - Veteran pacer Bhuvneshwar Kumar claimed a stunning hat-trick as Uttar Pradesh secured a narrow 10-run victory over Jharkhand in their Syed Mushtaq Ali Trophy (SMAT) group-stage match at the Wankhede Stadium on Thursday.

Chasing 161 for victory, Jharkhand looked steady in patches, but Bhuvneshwar's masterful swing derailed their chase. Bowling with the new ball, the Meerut-born pacer conceded just six runs in his first three overs.

When he returned in the 17th over, Bhuvneshwar delivered a game-changing final over, dismissing Robin Minz, Bal Krishna, and Vivek Anand Tiwari on consecutive deliveries to claim a sensational hat-trick.

He finished with exceptional figures of 4-1-6-3, ensuring Jharkhand fell short by 10 runs.

This was Uttar Pradesh's fifth win in seven matches, while this was Jharkhand's second defeat in seven games.

This performance caps off a historic SMAT season for Bhuvneshwar. Last month, in Uttar Pradesh's opening match against Delhi, he became the first Indian pacer to reach 300 T20 wickets, surpassing Jasprit Bumrah.

Bhuvneshwar has accumulated 90 T20I wickets between 2012 and 2022, making him India's second-highest wicket-taking pacer in the format. He has 181 wickets in 176 SMAT matches in Syed Mushtaq Ali Trophy.

## Mohammed Shami congratulates brother on his Syed Mushtaq Ali Trophy debut

**NEW DELHI:** Indian veteran bowler Mohammed Shami proudly congratulated his younger brother Mohammed Kaif on making his debut for Bengal in the prestigious Syed Mushtaq Ali Trophy on Thursday.

The event marked a significant milestone in Kaif's career as he took the field for his first match in one of India's top domestic T20 tournaments.

hami, known for his lethal fast bowling and leadership on the international stage, took to social media to express his pride.

"Congratulations to my brother Mohammed Kaif for representing



Bengal in the Syed Mushtaq Ali Trophy! Making your debut at this level is a big milestone, and I'm so proud of you. Keep giving your best and enjoying this journey. The entire family is cheering for you!" Shami wrote on X (formerly Twitter), his words echoing the deep family bond that has always been a foundation of his career.

## 'We Used To Put A Lot Of Pressure, But Jaiswal, Gill, Pant Are Fearless': Rohit Sharma

**New Delhi** - Team India has arrived in Australia with a young brigade, aiming to register a hat-trick of Border-Gavaskar Trophy wins. Some youngsters excelled in the opening fixture as the visitors clinched an enormous 295-run victory in Perth. Yashasvi Jaiswal stamped his authority Down Under with a scintillating century while Rishabh Pant



anchored India's batting in the first innings. Though Shubman Gill missed out with a fractured thumb, he showcased promise in the rain-curtailed practice game against Australia PM XI in Canberra.

As Rohit Sharma returns to lead India in Adelaide, he showered praise on the team's young guns. Addressing a press conference on Thursday, the Indian skipper highlighted their hunger to score and the attitude of keeping the team's interest ahead of individual performances.

"Their minds have just one thing can we win the match for our team? They don't think about hundreds. When you think this way, individual performance also happens," Rohit said.

"If you want to win, you have to perform. This is an automatic process. If your first focus is making the team win, then automatically it's reflected in their big scores. The primary focus is on winning matches.

## Border-Gavaskar Trophy: Adulation for Jasprit Bumrah in Australia feels Un-Australian

**New Delhi** - Fighting fire with fire! That's how the atmosphere is when India and Australia lock horns, especially in the Border-Gavaskar Trophy. There's no love lost. More than actual action on the field, it's the mind games that hog the limelight. As if half of the battle is fought outside the ground, inside the mind. Verbal volleys don't raise eyebrows anymore. However, 2024 has been a tad different.

his time around, Australia haven't gone hard at Indian cricketers, especially Jasprit Bumrah, who has troubled quality batters all around the world. In fact, the Australians have shown humility and admitted that the pacer can be a tough nut to crack. That Bumrah is also the No.1 ranked bowler in Tests shows how dominating he has been in the purest format.

Bumrah was expected to give the Australian batters nightmares. He did his reputation no harm after bagging the Player of the Match award in the Perth Test. In fact, it was his devastating five-wicket haul that dragged India back into the contest after they were bowled out for 150 in the first innings. Bumrah was unplayable, as it seemed to a layman watching on TV, let alone batters.

Travis Head has thoughts for Bumrah on similar lines. In the second innings at the Optus Stadium when Head was looking good for a well-made century, Bumrah shaped one away from him and found his outside edge. Given the form Head was in, it needed something special to pin Head down, and Bumrah had that special thing up his sleeves.

Head praised Bumrah to the extent that he called him amongst the 'greatest' pacers to have graced the game. Head, who has two hundreds against India in ICC Finals, stayed humble and accepted that facing an in-form Bumrah is as challenging as it could ever get.

"Jasprit will go down as probably one of the greatest fast bowlers to play the game. I think we're finding that at the moment -- how challenging he can be, and it's nice to play against that," Head said during a press conference.

"It's going to be nice to go back and look at your career and go tell the grandkids that you faced him. So not a bad series of playing with him. Hopefully I'll face a few more times, but he is as being challenging," Head added.

Steve Smith, one of the very best, said that facing Bumrah with an awkward run-up and action can give batters headaches, especially early in their knocks. In the first innings of the Perth Test, Smith shuffled across on the off-stump only to be dismissed LBW by Bumrah for a golden duck.





# जे.जे. रुग्णालयाच्या परिचर्या महाविद्यालयाच्या प्रमुखपदी डॉक्टरची नियुक्ती

● मुंबई, विशाल कारंडे :

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाने जे.जे. रुग्णालयामधील परिचर्या शिक्षण संस्थेच्या प्राचार्यपदी वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापकांची नियुक्ती केली आहे. मात्र भारतीय परिचर्या परिषदेच्या मानांकनानुसार ही नियुक्ती योग्य नसून, यामुळे परिचर्या शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना नोंदणीसाठी अडचणी येऊ शकतात. त्यामुळे परिचर्या संवर्गातील व्यक्तीचीच नियुक्ती करावी या मागणीसाठी जे.जे. रुग्णालयातील परिचर्या शिक्षण संस्थेतील सुमारे २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी बुधवारी सायंकाळपासून आंदोलनाला सुरूवात केली आहे. हे आंदोलन गुरुवारी दुसऱ्या दिवशीही सुरूच आहे.

जे.जे. रुग्णालयातील परिचर्या शिक्षण संस्थेच्या प्राचार्यांवर शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित असल्याने त्यांच्याकडील या पदाचा भार जे.जे. रुग्णालयातील न्यायवैद्यकशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. गजानन चव्हाण यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. मात्र हा पदभार सोपविताना भारतीय परिचर्या परिषदेच्या नियमांचे उल्लंघन करण्यात आले असल्याचा दावा परिचर्या शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांकडून करण्यात येत आहे. भारतीय परिचर्या परिषदेच्या नियमांनुसार परिचर्या महाविद्यालातील प्राचार्यपदासाठी परिचारिका संवर्गातून एमएस्सी नर्सिंग किंवा डॉक्टरेट पदवी मिळवलेली व्यक्ती पात्र असते.

तसेच त्या व्यक्तीला परिचारिका संवर्गामध्ये किमान १० वर्ष शिकविण्याचा अनुभव असणे अपेक्षित आहे. ही किमान अर्हता असलेली व्यक्तीच संस्थाप्रमुख होऊ शकते. मात्र जे.जे. रुग्णलयातील परिचर्या शिक्षण संस्थेच्या प्रमुखपदी नियुक्ती करताना या नियमाकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप विद्यार्थ्यांकडून करण्यात येत आहे. ही नियुक्ती तातडीने रद्द करून संबंधित पदावर परिचर्या संवर्गातील व्यक्तीची नियुक्ती करण्यात यावी, यासाठी जे.जे. रुग्णालयातील परिचर्या शिक्षण संस्थेतील २०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी बुधवारपासून साखळी उपोषण पुकारले आहे. जोपर्यंत आमची मागणी मान्य होणार नाही, तोपर्यंत आंदोलन सुरू राहिली, असा इशारा विद्यार्थ्यांनी दिला आहे.

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाने घेतलेल्या या निर्णयामुळे परिचर्या शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना भारतीय परिचर्या परिषदेकडे नोंदणी करताना 'सी' अर्ज भरावा लागतो. या अर्जावर संस्थाप्रमुखांची स्वाक्षरी आवश्यक असते. मात्र संस्थाप्रमुख हे परिचर्या संवर्गातील नसल्याने हे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, त्यामुळे परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. या नियुक्तीमुळे परिचर्या संवर्गातील एका महत्त्वाच्या पदावर डॉक्टर संवर्गातील व्यक्तीच्या नियुक्तीचा चुकीचा पायंडा पडेल. त्यामुळे भविष्यात परिचर्या संवर्गातील एका पदाचे नुकसान होण्याची शक्यता आहे.जे.जे. रुग्णालयातील परिचर्या शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांचे निवेदन आले आहे. त्यावर विचारविनिमय करून योग्य निर्णय घेण्यात येईल.

# वाघाच्या हल्ल्यात आणखी एक बळी


● नागपूर, नितीन देवळेकर :

भंडारा जिल्ह्यातील जांब-कांद्री वनपरिक्षेत्र अंतर्गत पिटेसूर गावाजवळ सुवर्णा नियत क्षेत्र (बिट) क्रमांक ५३ राखीव वनात बुधवार दिनांक चार डिसेंबर रोजी रात्री आठ ते नऊ वाजताच्या दरम्यान वाघाने एका गावकऱ्यावर हल्ला केला. यात ५० वर्षीय गावकरी जागीच ठार झाला. मृतकाचे नाव लक्ष्मण डोमा मोहणकर असून तो पिटेसूरचा रहिवासी आहे.

चार दिवसांपूर्वी चंद्रपूर जिल्ह्यात वाघाच्या हल्ल्यात महिला मृत्युमुखी पडली. सावली तालुक्यातील निलसनी पेडगाव गावानजीकच्या जंगलात दबा धरून बसलेल्या वाघाच्या हल्ल्यात रेखा मारोती येरमलवार (५५) ही महिला ठार झाली. ही घटना शनिवार, ३० नोव्हेबर रोजी सकाळी सात वाजता उघडकीस आली. येथील रहिवासी रेखा मारोती येरमलवार या शुक्रवारला सकाळी ११ वाजताच्या सुमारास झाडण्या कापण्यासाठी जंगलात गेली होती. नाल्याजवळ झाडण्या कापत असताना दबा धरुन बसलेल्या वाघाने अचानक हल्ला केला. यात रेखा जागीच ठार झाल्या.ब तर आता भंडारा जिल्ह्यात मृतक लक्ष्मण मोहनकर रात्री तलावावर मच्छी पकडण्यासाठी निघालेला होता. उशिरापर्यंत घरी परत न आल्यामुळे गावकऱ्यांनी रात्री अकरा वाजता शोध मोहीम सुरू केली तेव्हा त्याचे मृत शरीर जंगल भागात मिळाले.

पुढील कार्यवाही वन विभाग करीत आहे.

मृत शरीराचे मोहाडी ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात येणार आहे. या परिसरातील मनुष्यहानीची ही पहिलीच घटना आहे.



राज्यात आणि प्रामुख्याने विदर्भात गेल्या काही वर्षांत वाघाच्या हल्ल्याच्या घटना वाढल्या आहेत. यात मोठ्या प्रमाणावर मनुष्यहानी झाली आहे. प्रामुख्याने चंद्रपूर जिल्ह्यात वाघाच्या हल्ल्यात मनुष्यहानीच्या घटना अधिक आहेत. मात्र, अलीकडच्या दोन वर्षांत पेंच व्याघ्रप्रकल्पात देखील मानव वन्यजीव संघर्ष मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

भारतात गेल्या पाच वर्षांत वाघाच्या हल्ल्यात एकूण ३०२ माणसे मृत्युमुखी पडली. त्यापैकी ५५ टक्के मृत्यू केवळ महाराष्ट्रात झाले आहेत. केंद्राने पीडितांच्या कुटुंबीयांना नुकसान भरपाई म्हणून २९.५७ कोटी रुपये वितरित केले आहेत. २०२३ मध्ये भारतातील एकूण १६८ वाघांच्या मृत्यूपैकी सर्वाधिक ५२ मृत्यू देखील महाराष्ट्रातच झाले आहेत.

२०२२ मध्ये ११२ जण, २०२१ मध्ये ५९ जण, २०२० मध्ये ५१, तर २०१९ मध्ये ४९ जण आणि २०१८ मध्ये ३१ लोक वाघांच्या हल्ल्यामध्ये ठार झाले. या हल्ल्यांमध्ये केवळ महाराष्ट्रात १७० जण ठार झाले. त्यात २०२२ मध्ये ८५, २०२१ मध्ये ३२, २०२० मध्ये २५, २०१९ मध्ये २६ आणि २०१८ मध्ये दोन जण ठार झाले होते. उत्तर प्रदेशात गेल्या पाच वर्षांमध्ये ३९ जणांना वाघाच्या हल्ल्यात प्राण गमवावा लागला, त्यात २०२१ व २०२२ मध्ये प्रत्येक वर्षाला ११ जणांनी, २०२० मध्ये ४ जणांनी, २०१९ मध्ये ८ जणांनी, तर २०१८ मध्ये पाच जणांनी प्राण गमावले.

# अजित पवार यांनी वेगळ्या पद्धतीने घेतली उपमुख्यमंत्रीपदाची शपथ...



● मुंबई, राकेश गायकवाड :

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी आज तिसऱ्यांदा शपथ घेतली. त्याचवेळी उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी शपथ घेतली. अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदी शपथ घेण्याचा विक्रम केला. त्यांनी सहाव्यांदा उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेताना पिंक जॅकेट घातला होता. तसेच मी शपथ घेतो ऐवजी त्यांनी 'गांभीपूर्वक प्रतिज्ञा करतो की...' या शब्दाचा वापर करत वेगळपणा सिद्ध केला.

**अजित पवार यांनी केली प्रतिज्ञा**

अजित पवार यांनी शपथविधीला सुरुवात करताना म्हटले, 'मीअजित आशाताई अनंतराव पवार गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करतो की...' या शपथविधी समारंभाला त्यांनी संपूर्ण निवडणूक प्रचार दरम्यान वापरलेला गुलाबी जॅकट परिधान केला होता. शपथविधी सोहळ्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह केंद्रीय मंत्रिमंडळातील मंत्री उपस्थित होते. तसेच राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकार असलेले २२ राज्यांचे मुख्यमंत्री आले होते. उद्योगपती आणि बॉलीवूड स्टार सोहळ्यासाठी आले होते. सचिन तेंडुलकर आणि त्याची पत्नी अंजली तेंडुलकर शपथविधी सोहळ्यास उपस्थित होते. शेकडो दिग्गज व्यक्ती, साधू-महंत आणि ४० हजार नागरिकांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचा भव्य शपथ घेतली.

# महापालिकेच्या शाळेतील १५ विद्यार्थी भारत दर्शनसाठी रवाना

● पिंपरी, सुचिता देशमुख :

महापालिकेने पाचवी व आठवी मधील शिष्यवृत्ती परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या १५ विद्यार्थ्यांना भारत दर्शन अभ्यास दौऱ्यावर पाठविण्यात आले आहे. हे विद्यार्थी सहा दिवसांसाठी बंगळुरू, म्हैसूर, उटी आणि कोईम्बतूर येथे अभ्यास दौऱ्यासाठी रवाना झाले आहेत.



महापालिकेच्या शिक्षण विभागाने शिष्यवृत्ती परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याकरिता गेल्यावर्षी पासून भारत दर्शन अभ्यास दौरा सुरू केला आहे.

यावर्षीच्या अभ्यास दौऱ्यामध्ये विद्यार्थ्यांना भारतीय अंतराळ संशोधन संस्था आणि भारतीय विज्ञान संस्था या संस्थांना भेट देण्याची संधी मिळणार आहे. विद्यार्थ्यांना शास्त्रज्ञांशी संवाद साधता येणार आहे. त्यासोबतच, अंतराळ संशोधनाच्या क्षेत्राचा अभ्यास आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाबाबत माहिती मिळणार आहे. या अभ्यास दौऱ्यावर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीसाठी मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचा समावेश आहे. भारत दर्शन अभ्यास दौरा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी महापालिकेने सुरू केला आहे. हा उपक्रम महापालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करण्यासाठी महत्वाची भूमिका बजावित आहे.

# विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अतिविशेषोपचार रुग्णालयात आता 'अँजिओप्लास्टी'ची सुविधा

● लातूर, विशाल पाटील :

विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील अतिविशेषोपचार रुग्णालयातील हृदयरोगशास्त्र विभागात अँजिओग्राफी व अँजिओप्लास्टी सेवा सुरु करण्यात आली आहे. ०५ डिसेंबर २०२४ रोजी एका ५३ वर्षीय महिला रुग्णांवर हृदयरोगशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. संतोष कवठाळे यांनी या संस्थेच्या अतिविशेषोपचार रुग्णालयातील पहिली अँजिओग्राफी व अँजिओप्लास्टी (दोन स्टेन्ट बसवून) यशस्वीरित्या पूर्ण केली.



विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. उदय एस. मोहिते व अतिविशेषोपचार रुगणालयाचे विशेषकार्य अधिकारी डॉ. सुनिल होळीकर यांनी मागील एक वर्षापासून लातूर अतिविशेषोपचार रुगणालय येथे हृदयरोगशास्त्र विभागाचे कॅथलॅब सुरु करण्यासाठी प्रयत्न केले. डॉ. मेघराज चावडा यांनी महात्मा ज्योतीबा फुले योजनेअंतर्गत मान्यता घेवून मोफत दोन स्टेन्टची पूर्तता केली. त्यामुळे या रुग्णांवर मोफत अँजिओग्राफी व अँजिओप्लास्टी करण्यात आली. विलासराव देशमुख अतिविशेषोपचार रुग्णालयामध्ये अँजिओग्राफी व अँजिओप्लास्टी ही सुविधा महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत मोफत सुरु करण्यात आली आहे.

# ८ लाख 50 हजार युवक युवतींचा आपत्ती सुरक्षा प्रशिक्षणाचा शुभारंभ!

**रायगडात कोणत्याही आपतीला मदत करण्यास युवक युवतींची फळी उभारणार डॉ. जयपाल पाटील**



● अलिबाग, दिगंबर जाधव :

रायगड जिल्ह्यातील इयत्ता ८वी ते१५ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या ८ लाख 50 हजार विद्यार्थी यांना आपत्ती सुरक्षा युवक व युवती प्रशिक्षणाचा शुभारंभ नौदल दिनाच्या निमित्ताने टी. टी. पाटील हायस्कूल तीनविरा येथे करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर आपत्ती व्यवस्थापन तज्ञ डॉ. जयपाल पाटील, मुख्याध्यापक अनंत गायकर, रिलायन्सचे निवृत्त फायर अधिकारी मोहन मिटांगरे, आरसीएफ थळचे मुख्य फायर अधिकारी सतीश निरगुडे,ह. भ. प. कुथे, वनबीट अधिकारी पाटील, पोयनाड पोलीस ठाण्याचे हवालदार म्हात्रे. ॲड. रत्नाकर पाटील,रमेश पाटील उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात येऊन मुख्याध्यापक अनंत गायकर यांनी गुलाब पुष्प देऊन सन्मान केला यावेळी सर्वांकडून डॉ. जयपाल पाटील यांनी संविधान वाचन करून घेतले आपल्या गावात शाळेत कॉलेजला जाता येता अपघात, घर, कारखाने शेतात वाढीत आग लागली तर महिला मुलींच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही महाराष्ट्र पोलिसांचा ११२ क्रमांकाचा वापर गावातील महिलांना बाळंतपणासाठी आरोग्य केंद्रात १०२ रुग्णवाहिकेचा वापर कसा करावा,गावात व गावाशेजारील जंगलात आग लागली तर वन खात्याचा वापर कसा करावा याचे ज्ञान प्रत्येक मुला-मुलींना असलेच पाहिजे ज्यामुळे ते प्रशासनाला पुढे मदत करतील यासाठी रायगडचा युवक फाउंडेशन व रायगड जिल्हाधिकारी आपत्ती प्राधिकरणातर्फे संपूर्ण रायगड जिल्ह्यातील माध्यमिक शाळा कॉलेजमध्ये जिल्ह्यातील शाळा महाविद्यालय कॉलेजमध्ये हे प्रशिक्षण घेण्याची सुरुवात आज करीत असल्याचे सांगून अपघाताच्या वेळी १०८ रुग्णवाहिकेचे प्रात्यक्षिक देताना डॉ. जयप्रकाश पांडे व पायलट पाटील, बाळंतपणासाठी १०२ ला फोन कर लावताच पेंढाबे प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ.सोहम यांनी चालक स्वप्निल पाटील यांना पाठविले.



आणि मुलींच्या सुरक्षेसाठी ११२ क्रमांकाचा वापर करतात पोयनाड पोलीस ठाणे येथून गावात अगर गावात शेजारी आग लागतात मोठी आरसीएफ थळ येथे अश्विन जॉन यांनी आगीचा बंब आणि कर्मचारी यांना तातडीने पाठविले व त्यांनी येऊन आग विझवली गाव शेजारील जंगलात वनवे पेटले तर वन खात्याला या क्रमांकावर फोन लावताच वनखात्याचे कारलेखन बीट अंमलदार श्री पाटील आपली मशीन सहित टीम घेऊन उपस्थित झाले. मुलांना ही संबंधीची माहिती रिलायन्स निवृत्त फायर अधिकारी व आरसीएफचे अधिकारी यांनी मार्गदर्शन केले. शेवटी गावात मृत्यू होतो तेव्हा तिरडीची आवश्यकता असते ती कशी बांधावी याचा प्रात्यक्षिक ह. भ. प. कुथे, खिडकी ग्रामपंचायत तंटामुक्ती अध्यक्ष रमेश पाटील यांनी दिले.कार्यक्रम यशस्वी करण्यास शाळेचे शिक्षक श्री. नलावडे सौ. भगत सौ. जुईकर श्री तांडेल सौ. अधिकारी श्री. आधार,कर्मचारी पाटील आपत्ती सुरक्षा मित्र विकास रणपिसे, महेंद्र खैरे यांनी परिश्रम घेतले.

# साताऱ्यात निष्ठावंतांच्या सोयीसाठी पक्षश्रेष्ठींची तारेवरची कसरत

● सातारा, सचिन कदम :

विधानसभा निवडणुकीमध्ये अखेर गंगेत घोडं न्हायले. अशी स्थिती झाली आहे. सातारा जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघात महायुतीने निर्विवाद वर्चस्व निर्माण केले आहे. अनेकांनी पक्ष बदल केल्यामुळे काहीजण चांगलेच यशाची वाटेकरी बनले आहेत. तरी निष्ठावंतांना आगामी स्थानिक स्वराज्य संस्था व नगरपालिका निवडणुकीत संधी मिळावी. यासाठी आता पक्षश्रेष्ठींना राजकीय तारेवर कसरत करावी लागत आहे. विधानसभा निवडणूक त्यानंतर सत्ता स्थापन, मंत्रिमंडळाची निवड ही प्रक्रिया कासव गतीने सुरूच आहे. परंतु गेले साडेतीन वर्ष स्थानिक स्वराज्य संस्था व नगरपालिका निवडणुका होऊ शकलेल्या नाहीत. महायुतीच्या नेत्यांना अजूनही यश मिळेल याची खात्री वाटत नाही का? असाच थेट प्रश्न आता राजकीय विश्लेषक करू लागलेले आहेत. सध्या विधानसभा मतदारसंघांमध्ये एक ते तीन




तालुक्यांचा समावेश झाल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या व नगरपालिका निवडणुकीसाठी इच्छुकांची भाऊ गर्दी झालेली आहे. त्यातच महायुती व महाविकास आघाडीच्या निर्मितीने दुष्काळात तेरावा महिना सुरू झालेला आहे. नेत्यांच्या अभिनंदन वाढदिवस व निवडीचे फलक लावून दुसरी फळीतील कार्यकर्ते खर्च करत आहेत. अर्थात हे खर्च ते खिशातून न करता लाभार्थींच्या निधीतून मिळालेल्या खर्च करत असल्याचे लपून राहिलेला नाही. हे सुद्धा खरे आहे. परंतु सर्वजण लाभार्थी नसून काही प्रामाणिक कार्यकर्ते सुद्धा स्व खर्चाने नेते व पक्षाची भूमिका मांडताना खर्च करत आहे. त्यांच्यावर खऱ्या अर्थाने लक्ष देणे. हे माहितीच्या लोकप्रतिनिधी व नेत्यांसाठी कर्तव्यदक्ष भूमिकाच ठरणार आहे. समाज व प्रसार माध्यमातून चमकुगिरी करणारे व्यावसायिक कार्यकर्ते व त्यांना साथ सोबत करणारे यांचीच आता चलती आहे. त्यामुळे निष्ठावंतांवर आता वरिष्ठ नेत्यांनी मर्जी राखावी. असा सूर उमटू लागलेला आहे. आजही निष्ठावंत कार्यकर्त्यांकडून आपली भक्कम बाजू मांडण्यात यश आलेले आहे. सातारा जिल्हा परिषद व सातारा जिल्ह्यातील नगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था व सहकारी संस्थांमध्ये प्रस्थापित दोन नंबरच्या नेत्यांपेक्षा प्रामाणिकपणाने एक नंबरचे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी मिळावी. अशी मागणी सातारा जावळी तालुक्यातून प्रथमच पुढे आलेले आहे. याचा नेत्यांना कधीच विसर पडणार नाही. अशी आशा पल्लवी झालेली आहे. एक व्यक्ती एक पद हाच निकष लावण्याची गरज आहे. सातारा जावळी मतदारसंघातील समाज व प्रसार माध्यमातून दूर असणारे परंतु पायात भिंगरी बांधून प्रचार करणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी मिळावी.